मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक » सोमवार, ५ मे २०२५ » वर्षः ६ » अंकः१३६ » पाने-८ » किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## कोस्टल रोडवर वाहने एकमेकांना भिडली

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

मुंबईतील कोस्टल रोडवर भीषण अपघात झाला आहे. चार ते पाच वाहनांची एकमेकांना धडक लागल्याने हा अपघात झाला आहे. या भीषण अपघातात नऊ जण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. गेल्या काही दिवसांपासून कोस्टल रोडवर अपघातांची मालिका सुरूच आहे. कोस्टल रोडवर सुसाट वाहनांवर आणि निष्काळजीपणे वाहन चालवणाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी करण्यात येत आहे. या अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. मुंबई कोस्टल रोडवर भीषण अपघात घडला. हा अपघात इतका भीषण होता की अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. कार, टॅक्सी आणि इतर वाहनांचा यात समावेश होता. या वाहनांची अचानक एकमेकांना जोरदार धडक दिली. ही वाहनं एकमेकांवर आदळल्या. या सर्व वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर एकूण 9 प्रवाशी जखमी झाले आहेत. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

## अग्राग्रलेख — खरीखरी

# मी मुख्यमंत्री होणारच!

महाराष्ट्राचे अर्धा डझन वेळा उपमुख्यमंत्री झालेले, कर्तबगार अर्थमंत्री म्हणून ज्यांनी आपला झेंडा बुलंद केलेला आहे. अशा अजित दादांच्या मनात मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्र्याचा कक्ष काही डोळ्यासमोरून हलत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी जसे दर महिन्याला मन की बात करतात. तसेच अजित दादा आपली दिल की बात करतात. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा चेहरा मोठा मिश्कील आहे. पण त्यांचा स्वभाव मात्र कडक आहे. त्यांच्या कपाळावर सतत आठ्या असतात. त्यामुळे त्यांचा चेहरा अधिक बोलका दिसतो. आपले सख्खे काका शरदचंद्रजी पवार यांच्या मनातील विचार या सख्ख्या पुतण्याला तर सोडाच, जगात कुणालाही ओळखता येत नाहीत. त्यांचा निर्विकार चेहरा त्यांच्या मनात काय आहे. याचा थांगपत्ताच लागू देत नाही. अशा मुख्यमंत्री राहिलेल्या काकांची वारंवार उपमुख्यमंत्री राहिलेल्या पुतण्याने तक्रार करणे क्रमप्राप्त होते. आपल्या काकांनीच आपल्याला मुख्यमंत्री बनू दिले नाही. हा सल त्यांच्या मनात आजही कायम आहे. प्रत्येक वेळी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात ठरलेले होते की, ज्यांना जास्त जागा त्या पक्षाचा मुख्यमंत्री आणि दुसऱ्या पक्षाचा उपमुख्यमंत्री. २००५ च्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला काँग्रेसपेक्षा दोन जागा जास्त मिळाल्या होत्या. पण तेव्हा काकांची चलती होती. काकांनी काँग्रेसला मुख्यमंत्रीपद दिले. विलासराव देशमुख यांना ते पद मिळाले. पण त्या बदल्यात महत्त्वाची मलईदार मंत्रालये राष्ट्रवादीकडे आली. त्यावेळी अजितदादा मुख्यमंत्री बनू शकले असते. पण काका शरद पवार यांनी असा काय वार केला की, मोहक शरद ऋतू विदर्भातील ग्रीष्मासारखा वाटू लागला. परवा मुंबईत आयोजित महाराष्ट्र महोत्सवाच्या समारोपात एका पत्रकाराने महाराष्ट्रात अद्याप महिला मुख्यमंत्री झाली नाही. याचा उल्लेख केला, तसेच एखाद्या महिलेला हे पद मिळाले पाहिजे असे म्हटले. त्याला अजितदादा पवार यांचा विरोध असण्याचे कारण नव्हते. परंतु अजित दादांच्या मनातील खदखद तेव्हाही बाहेर आली. मुख्यमंत्री कोणीही असले तरी म्हणजेच ते काँग्रेसचे असोत, शिवसेनेचे असोत किंवा भाजपचे असोत. अजित दादांना मात्र उपमुख्यमंत्री पद म्हणजे उपमुख्यमंत्री पदच त्यांच्या वाट्याला येत गेले. काकांनी अपेक्षित सहयोग न दिल्यामुळे आपल्याला संधी असूनही मुख्यमंत्रीपद मिळाले नाही. मग हे त्यांच्या मनाला बोचणार नाही तर काय. काकांच्या छत्रछायेखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आपल्या राज्याचे सर्वोच्च पद मिळू शकणार नाही. असे वाटल्याने त्यांनी राष्ट्रवादीतील आमदार मोठ्या संख्येने आपल्याकडे वळवले आणि ते सत्तेमध्ये डेरेदाखल झाले. त्यापूर्वी बहुसंख्य शिवसेनेचे आमदार सुरतमार्गे गुवाहाटीला गेले होते. त्याचे बक्षीस म्हणून अपेक्षा नसतानाही भारतीय जनता पक्षाच्या पक्ष श्रेष्ठींनी एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्री पदावर शिक्कामोर्तब केले होते. अजित पवार यांना दुसरे उपमुख्यमंत्री पद देण्यात आले आणि शिवसेना व भाजपमधील कितीतरी मंत्रीपद इच्छुक आमदारांची घनघोर निराशा झाली. आता नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीतील महाविजयाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीचे पक्षश्रेष्ठीही मुख्यमंत्री पदापासून दूर ठेवू शकले नाहीत. म्हणजे आता निदान पुढील चार ते साडेचार वर्षे तरी मुख्यमंत्री पदाची अपेक्षा करणे शक्य नाही, हे स्पष्ट झालेले आहे. पुढील निवडणुकीत सध्याच्या भाजपच्या जेवढ्या जागा निवडून आलेल्या आहेत. तेवढ्या जागा भाजपच लढणार आहे. म्हणजे अजित दादांना मुख्यमंत्री व्हायचे असेल. तर भारतीय जनता पक्षाच्या जागा कमी झाल्या पाहिजेत आणि अजितदादांच्या जागा वाढल्या पाहिजेत. हे गणित पुढील निवडणुकीत बरोबर जमले, तर अजितदादा मुख्यमंत्री बनू शकतील. कसेही करून त्या पदापर्यंत पोहोचायचा मार्ग अजितदादा आपल्या करारी स्वभावाप्रमाणे शोधून काढू शकतात. महाराष्ट्राचा कोपरा न् कोपरा काकांप्रमाणेच त्यांनाही ठाऊक आहे. तेव्हा आता सदा सर्वकाळचे उपमुख्यमंत्री अजित दादांनी कंबर कसून आपल्या पक्षाच्या प्रचारासाठी आणि पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनवण्यासाठी 80 ते 90 आमदार निवडून आणले पाहिजेत. एवढ्या जागा युती सरकारच्या सध्याच्या व्यवस्थेप्रमाणे कशा मिळवायच्या याचे गणित दादांच्या मनात असेलच. हे गणित सोडवण्यासाठी दादांनी आता स्वतः कंबर कसली पाहिजे. काकांनी दिले नाही तर काय झाले. आपण स्वबळावर मुख्यमंत्री होणार हा त्यांचा निर्धार असावा. सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मी पुन्हा येणार असे म्हटले. मध्यंतरीच्या काळात अर्धविराम घेतला आणि आता ते पाच वर्षांसाठी मुख्यमंत्रीपदावर आरूढ झालेले आहेत, एक गोष्ट मात्र नक्की आहे. ज्याच्या हाती तिजोरीची चावी तो मनात येईल त्याला दाबी, हे आता अजित दादांनी दाखवून द्यावे, म्हणजे मी मुख्यमंत्री होणारच, ही त्यांची मनीषा पूर्ण होईल.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# भारताचा वॉटर स्ट्राईक

## पाकिस्तानसाठी चिनाबचे पाणी थांबवले

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवण्यासाठी सर्व बाजूंनी मुस्कटदाबी सुरू केली आहे. जम्मू-कश्मीरमधील बागलीहार जलविद्युत प्रकल्प पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तानमधील वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे. भारताने सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर आता चिनाब नदीचे पाणी बागलीहार धरणाद्वारे रोखण्याचा निर्णय घेतला आहे.

सिंधू पाणी वाटप करार रद्द केल्यानंतर वुलर सरोवराचे पाणीही पाकिस्तानसाठी बंद केले. आता त्यापुढे जाऊन चिनाब नदीवर असलेल्या बागलीहार प्रकल्पाचे पाणी अडवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा पाकिस्तानसाठी आणखी एक धक्का असल्याचं सांगितलं जातंय.

भारताने जम्मू-कश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ही कारवाई केली आहे. या हल्ल्यात २५ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर भारताने १९६० पासून सुरू असलेली आणि जागतिक बँकेच्या मध्यस्थतेत झालेली सिंधू पाणी वाटप करार रद्द केला आहे. जम्मूच्या रामबनमध्ये असलेल्या बागलीहार प्रकल्पातील पाण्याचे वहन नियंत्रित करण्याची भारताकडे क्षमता आहे. तसंच, झेलम नदीवर असलेल्या किशनगंगा प्रकल्पासंदर्भातही भारत लवकरच कडक निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. बागलीहार धरण हा भारत आणि पाकिस्तानमधील अनेक वर्षांपासूनचा वादाचा मुद्दा आहे. पाकिस्तानने यापूर्वीही याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेषतः जागतिक बँकेकडे मध्यस्थतेची मागणी केली होती. त्याचप्रमाणे, किशनगंगा प्रकल्पामुळे नीलम (झेलमची उपनदी) नदीच्या प्रवाहावर होणाऱ्या परिणामांविषयीही पाकिस्तानने आक्षेप नोंदवले आहेत. सिंधू पाणी वाटप करार १९६० मध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे राष्ट्रपती अयुब खान यांच्या पुढाकाराने करण्यात आला होता. या करारानुसार, रावी, बियास आणि सतलज नद्यांच्या पाण्याचे अधिकार भारताच्या नियंत्रणात देण्यात आले. तर सिंधू, चिनाब व झेलम नद्या पाकिस्तानच्या नियंत्रणात राहिल्या. मात्र भारताला काही मर्यादित प्रमाणात सिंचन, वीज निर्मिती आणि घरगुती वापरासाठी पाण्याचा वापर करण्याची मुभा देण्यात आली होती.

पाकिस्तानची कृषीप्रधान अर्थव्यवस्था मुख्यत्वे सिंधू नदी प्रणालीवर अवलंबून आहे. पाकिस्तान आपल्या पाण्याच्या ९३ टक्के गरजा या पाश्चिमेकडील नद्यांमधून पूर्ण करतो. देशातील सुमारे ८० टक्के शेती सिंधू प्रणालीच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे भारताकडून सिंधू पाणी वाटप करार रद्द करण्याचा इशारा मिळाल्यानंतर पाकिस्तानमधील राजकीय आणि लष्करी पातळीवर अस्वस्थता, संताप व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्रातील सहा जिल्ह्यांना हाय अलर्ट

## अतिमुसळधार पावसाचे संकेत



**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

देशातील अनेक भागांमध्ये सध्या कडाक्याचं ऊन पडत आहे. तपमानात प्रचंड वाढ झाली आहे. वाढत्या उष्णतेमुळे रस्ते सुनसान झाले आहेत. याचदरम्यान आता पुन्हा एकदा हवामान विभागानं देशातील अनेक भागांमध्ये वादळी वारा आणि विजांसह अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. अतिमुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देखील देण्यात आला असून, आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडा असं आयएमडीनं म्हटलं आहे.

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पूर्व राजस्थान, पश्चिम आणि पूर्व मध्य प्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, ओडिशा, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. या काळात वाऱ्याचा वेग प्रति तास ५०-६० किमी एवढा प्रचंड राहणार असल्याचा इशाराही हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. यासोबतच हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल आणि सिक्किम मध्ये देखील वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. ४०-५० किमी प्रति तास वेगानं वारे वाहण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये आयएमडीकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाकडून भंडारा, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यामध्ये वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर दुसरीकडे अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या काळात ४०-५० किमी प्रति तास वेगानं वारे वाहन्याची शक्यता आहे.

# भारताला भागीदारांची गरज, उपदेशकांची नव्हे

## एस. जयशंकर यांनी युरोपियन युनियनला सुनावले

**नवी दिल्ली, दि.४ वृत्तसंस्था**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पुन्हा एकदा युरोपीय राष्ट्रांना जागतिक बाबींवरील त्यांच्या दुटप्पी भूमिकेवरून फटकारलं आहे. भारताला उपदेशकांची नाही तर भागीदारांची गरज असल्याचं म्हटलंय. युरोपियन यूनियन भागीदाराकडून नवी दिल्लीच्या अपेक्षा आणि युरोपीय गटाच्या सर्वसाधारण भूमिकेला जयशंकर यांनी उत्तर दिलं.

“जेव्हा आपण जगाकडे पाहतो, तेव्हा आपण भागीदारी (सहकार्य) शोधतो. आपण धर्मोपदेशकांना शोधत नाही. धर्मोपदेशक जे उपदेश करतात ते स्वतः आचरणात आणत नाहीत. मला वाटतं की काही युरोपीय देश अजूनही त्या समस्येशी झुंजत आहेत. त्यातील काही बदलत आहेत, असं जयशंकर म्हणाले.

जर बीजिंगशी समस्या वाढल्या तर युक्रेनवरील नवी दिल्लीच्या भूमिकेमुळे त्याला मिळणाऱ्या जागतिक पाठिंब्यावर परिणाम होऊ शकतो, या युरोपीय धोरणाला नकार देत, जयशंकर यांनी २०२२ मध्ये म्हटलं होतं की भारताचे चीनशी कठीण संबंध आहेत, परंतु, ते व्यवस्थापित करण्यास पूर्णपमे सक्षम आहेत. त्यांनी पुढे म्हटलं होतं की, युरोपने या मानसिकतेतकून बाहेर पडावं की त्यांच्या समस्या या जगाच्या समस्या आहेत, परंतु जगाच्या समस्या युरोपच्या समस्या नाहीत.

## आज बारावीच्या परीक्षेचा निकाल

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

राज्यभरातील बारावीच्या विद्यार्थ्यांसह पालकांची प्रतीक्षा लागून राहिलेल्या निकालाची अखेर तारीख समोर आली आहे. महाराष्ट्र बोर्डाचा बारावीचा निकाल उद्या म्हणजेच सोमवारी जाहीर केला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं उच्च माध्यमिक प्रमाणपत्र निकालासाठी अधिसूचना जारी केली आहे. अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र बोर्ड बारावीचा निकाल उद्या दुपारी जाहीर केला जाणार आहे.

यंदाच्या वर्षी परीक्षेत एकूण १५,०५,०३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ८,१०,३४८ मुले, तर ६,९४,६५२ मुली आहेत. यंदा ३७ तृतीयपंथी नागरिकही परीक्षेसाठी बसले आहेत. राज्यात एकूण १०,५५० कनिष्ठ महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ३,३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. अशातच बोर्डाच्या वतीनं घेण्यात येणाऱ्या पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यानंतर, विद्यार्थी अधिकृत वेबसाईट [mahresult.nic.in](http://mahresult.nic.in) वर जाऊन गुणपत्रिकेची प्रत डाऊनलोड करून निकाल पाहू शकतील.

# जिल्हा बँकेकडून ५६ हजार शेतकऱ्यांना जमीन जप्तीच्या नोटीसा

## उद्या नाशिकमध्ये काळाराम मंदिरात साकडे आंदोलन

**नाशिक, दि. ४ प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा बँकेच्या थकित कर्जदारांकडून उद्या काळाराम मंदिरात साकडे आंदोलन करण्यात येणार आहे. सीता नवमीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी घालणार सीतामाईला साकडे घालणार आहेत. शेतकरी संघटना कर्जमुक्ती आंदोलन समितीकडून हा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. नाशिक जिल्हा बँकेकडून तब्बल ५६ हजार शेतकऱ्यांना जमीन जप्तीच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्यानंतर नाशिक जिल्हा बँकेला राज्य सरकारकडून निधी देण्याची मागणी केली जात आहे.

नाशिक जिल्हा बँक मोठ्या आर्थिक अडचणीत सापडली असून जिल्हा बँकेच्या ५६ हजार थकीत कर्जदारांना जमीन जप्तीच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र सरकारकडून शेतकरी कर्जमाफीची घोषणा करण्यात आली, तसेच जिल्हा बँकेला आर्थिक मदतची घोषणा देखील करण्यात आली. मात्र कोणतीही कार्यवाही अद्याप पर्यंत झाली नसल्याने शेतकरी संघटना कर्जमुक्ती समितीच्या माध्यमातून उद्या नाशिकच्या काळाराम मंदिरात सीता नवमीच्या पार्श्वभूमीवर सीतामाईला साकडे घालत आंदोलन करण्यात येणार आहे. शेतकरी संघटनेचे पदाधिकारी भगवान बोराडे यांनी सरकार घोषणा करते कृषिमंत्री स्थगिती देतात तर, जिल्हा बँकेचे प्रशासक राजीनामा देतात यामुळे जिल्हा बँक अडचणीतून बाहेर येणार तरी कशी असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

नाशिक जिल्हा बँकेचे एकूण २२०० कोटी रुपयांचे कर्ज थकीत आहे. बँक आर्थिक अडचणीत असल्यामुळे सक्तीची कर्जवसुली केली जात असून जिल्ह्यातील ४० हजार कर्जदारांना सहकार कायद्याच्या कलम १०१ अंतर्गत नोटीस बजावली. त्यापैकी ११०० कर्जदारांच्या मालमत्तेवर बँकेचे नाव लागले आहे. बँकेच्या या प्रक्रियेस शेतकरी संघटनांनी विरोध केला. सरकार कर्जमाफी देणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी कर्ज भरले नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यांना दिलासा देण्यासाठी बँकेने कर्जाच्या प्रकारानुसार ‘वन टाईम सेटलमेंट’ (ओटीएस) ही योजना राबवावी, त्याला शेतकरी निश्चितपणे प्रतिसाद देतील, असा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत. जिल्हा बँकेचे २८ हजार कर्जदारांकडे एक लाखापर्यंतचे ५० टक्के कर्ज थकीत आहे. तर पाच लाखांपर्यंत कर्ज थकीत असलेले 45 टक्के खातेदार आहेत. त्यामुळे ९३ टक्के कर्जदार हे पाच लाखांच्या आतील आहेत. त्यांच्यासाठी जिल्हा बँक ही आरबीआय नाबार्डच्या नियमांचा व्यवस्थितरित्या अभ्यास करुन -‘ओटीएस’ योजना लागू करणार आहे.

# मुंबईहून सुटलेल्या अवंतिका एक्स्प्रेसमध्ये चाकू हल्ला

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

मुंबईहून सुटलेल्या अवंतिका एक्स्प्रेसमध्ये एका प्रवासी महिलेवर चाकूने हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सदर महिला मुंबईहून इंदोरला आपल्या मुलांना



आणण्यासाठी प्रवास करत होती. मात्र, प्रवासादरम्यान तिचा तिच्याच डब्यातील काही प्रवाशांशी वाद झाला आणि त्याचे पर्यवसान थेट हिंसक हल्ल्यात झाले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईहून सुटलेल्या अवंतिका एक्स्प्रेसमध्ये महिला प्रवास करत होती. तिच्या डब्यात असलेल्या लोकांसोबत महिलेचा वाद झाला. या वादातून तिला मारहाण करून तिच्या हाता पायावर धारदार चाकूने वार करण्यात आले. या हल्ल्यात ती महिला गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने वैद्यकीय उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

ही घटना घडल्यानंतर पालघर स्थानकात पोलिसांनी तत्काळ लक्ष घालून संबंधित प्रकरणी गुन्हा दाखल केला. पुढील तपास सुरू करताच आरोपी हे वापी येथे असल्याची माहिती मिळाली आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

अटक केलेल्या आरोपींविरोधात विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळ, प्रत्यक्षदर्शी आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली असून, हल्ल्यामागील नेमकी कारणे आणि अन्य कुठले सहकारी आरोपी आहेत का, याची चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे रेल्वेतील प्रवासी सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे प्रशासन काय उपाययोजना करते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मविआकडून अजितदादांना मुख्यमंत्रिपदाची ऑफर

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**





उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनेकदा मुख्यमंत्रिपदाबाबत वक्तव्य केलं आहे. त्यातून त्यांची मुख्यमंत्रिपदाची इच्छा देखील दिसून येते, दरम्यान त्यांनी पुन्हा एकदा दोन मे रोजी मुख्यमंत्रिपदासंदर्भात एक वक्तव्य केलं होतं, त्यामुळे ते चर्चेत आले. ‘मुख्यमंत्रिपदासाठी योग जुळून यावा लागतो. कारण मलाही गेल्या अनेक वर्षांपासून वाटतं की मी मुख्यमंत्री व्हावं. पण कुठे जमतंय,” असं अजित पवार यांनी म्हटलं. दरम्यान अजित पवार यांच्या या वक्तव्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. ते रत्नागिरीमध्ये बोलत होते.

विनायक राऊत यांनी अजित पवार यांना थेट मुख्यमंत्रिपदाची ऑफर दिली आहे. अजित पवार यांनी महाविकास आघाडीमध्ये यावं, त्यांचे मुख्यमंत्री होण्याचं स्वप्न पूर्ण होईल असं विनायक राऊत यांनी म्हटलं आहे. तसेच एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये दुरी वाढत असून शिंदेंना नैराश्य आलं आहे, असा टोलाही यावेळी राऊत यांनी लगावला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राच्या अस्तिवापुढे आमचे वाद, भांडणं या शुल्लक गोष्टी असल्याचं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं. तर उद्धव ठाकरे यांनी देखील राज ठाकरे यांच्या भूमिकेला सकारात्मक प्रतिसाद दिला होता, यावर देखील यावेळी विनायक राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ठाकरे बंधू एकत्र यावेत ही महाराष्ट्र्याच्या जनतेची इच्छा असल्याचं राऊत यांनी म्हटलं आहे.

पहलगामध्ये मोठा दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यामध्ये 26 जणांचा मृत्यू झाला तर अनेकजण जखमी झाले, या हल्ल्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. पहलगाममध्ये दहशतवादी अचानक आले नाहीत, पहलगाम हल्ला हा मोदी सरकारचं अपयश आहे, सध्या युद्धाचं वातावरण तयार केले जात असून, पक्षाची प्रसिद्धी केली जात आहे. अनेक लोकउपयोगी योजना बंद पडल्या आहेत, असा हल्लाबोल यावेळी राऊत यांनी केला आहे.

# जम्मू-काश्मीरच्या रामबनमध्ये लष्कराचा ट्रक 600 फूट दरीत कोसळल्याने 3 जवानांचा मृत्यू

**रामबन, दि. ४ वृत्तसंस्था**



जम्मू-काश्मीरमधील रामबनमध्ये एका राष्ट्रीय महामार्गावर एका लष्करी वाहनाला भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. लष्कराचा ट्रक ६०० फूट खोल दरीत कोसळल्याने ३ जवानांचा मृत्यू झाला आहे. लष्कराचा हा ट्रक जम्मूकडून काश्मीरच्या दिशेने येत असल्याचं सांगितलं जात आहे. रामबन जिल्ह्यात लष्करी जवानांना घेऊन जाणारा हा ट्रक रस्त्यावरून घसरल्यामुळे हा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे.

लष्कराच्या ट्रकचा अपघात घडल्यानंतर तातडीने स्थानिक पोलीस, लष्कर, एसडीआरएफ आणि सिव्हिल क्यूआरटीसह रामबन येथील स्थानिक स्वयंसेवकांनी बचाव कार्य सुरू केलं आहे. मात्र, या अपघातात ३ जवानांना जागीच मृत्यू झाला आहे, तर २ जवान गंभीर जखमी झाले असल्याचं वृत्त आहे.

या अपघातात मृत्यू झालेल्या सैनिकांची ओळख पटली असून अमित कुमार, सुजीत कुमार आणि मान बहादूर असं या तीन जवानांचं नाव असल्याची माहिती आहे.वृत्तानुसार, त्यांचे मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात येत आहेत. तसेच या अपघातात लष्कराच्या वाहनाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.

दरम्यान, जम्मूहून श्रीनगरला राष्ट्रीय महामार्ग ४४ वर लष्कराच्या वाहनाचा ताफा जात होता. मात्र, यातील एका लष्कराच्या ट्रकचे नियंत्रण सुटल्याने बॅटरी चष्माजवळ सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की, या अपघातात गाडीचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे.

दरम्यान, याआधी पूंछ जिल्ह्यात देखील अशाच प्रकारच्या अपघाताची घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. लष्कराची एक गाडी ३५० फूट खोल दरीत कोसळली होती. त्यामध्ये ५ जणांचा मृत्यू झाला होता. चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात घडल्याची माहिती तेव्हा सांगण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा लष्कराचा ट्रक ६०० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना घडली आहे.

# हवाई दल प्रमुख अमरप्रीत सिंह यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**

२२ एप्रिलला जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. भारत आणि पाकिस्तानमध्य सध्या तणावाची स्थिती आहे. याच पार्श्वभूमीवर, एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यामध्ये हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पाकिस्तानसोबतच्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. शनिवारी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांनी पंतप्रधानांची भेट घेतली होती.

शनिवारी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यांनी पंतप्रधान मोदींची त्यांच्या लोक कल्याण मार्गावरील निवासस्थानी भेट घेतली होती. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर हवाई दल प्रमुख आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील ही बैठक झाली. त्या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण प्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान आणि तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख उपस्थित होते. त्या बैठकीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल देखील उपस्थित होते.

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या एक दिवसानंतर सुरक्षा मंत्रिमंडळ समितीची (सीसीएस) बैठक झाली. या हल्ल्यात 26 जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. सरकारने दहशतवादाचा नाश करण्याच्या भारताच्या राष्ट्रीय संकल्पाचा पुनरुच्चार केला आहे. दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना आणि कट रचणाऱ्यांना कठोर शिक्षा होईल असा इशारा सरकारकडून देण्यात आला आहे. सरकारने सशस्त्र दलांना पूर्ण "कारवाईचे स्वातंत्र्य" दिले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. दहशतवाद्यांवर सरकारने केलेल्या कोणत्याही कारवाईला विरोधी पक्षांनी पूर्ण पाठिंबा दिला आहे.

# डोंबिवलीत नगरसेवकाच्या आजी-माजी समर्थकांमध्ये छोट्या तलवारी, लोखंडी रॉडने तुंबळ हाणामारी

**डोंबिवली, दि. ४ प्रतिनिधी**

डोंबिवलीमध्ये रात्रीच्या सुमारास डोंबिवली पश्चिमेकडील राजू नगर परिसरात भाजपच्या माजी नगरसेवकाच्या आजी-माजी समर्थकांमध्ये तुंबळ हाणामारी झाली. भाजपचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांच्या आजीमाजी समर्थकांमध्ये जोरदार राडा झाला. तलवारी, लोखंडी रॉड, दगडांनी दोन्ही गटाकडून मारहाण करण्यात आली आहे. या राड्यात तीन ते चार जण जखमी झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी विष्णू नगर पोलीसानी दोन्ही गटांनी दिलेला तक्रारीनुसार दोन्ही गटांविरोधात गुन्हे दाखल करत तीन जणांना अटक केली आहेत. याप्रकरणी विष्णू नगर पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. भाजप नगरसेवकांच्या आजी-माजी समर्थकांमध्ये झालेल्या या राड्यामुळे डोंबिवलीत एकच खळबळ उडाली आहे.

दुपारच्या सुमारास भाजपचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे हे कामानिमित्त एका बिल्डरच्या ऑफिसमध्ये गेले होते. यावेळी त्याठिकाणी मेघराज तुपांगे आले. तुपांगे आणि म्हात्रे यांचे सुरक्षारक्षक यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. याप्रकरणी या सुरक्षा रक्षकाने विष्णू नगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. मेघराज तुपांगे हे काही वर्षांपूर्वी भाजप नगरसेवक विकास म्हात्रे यांच्या समर्थक होते. मात्र काही कारणावरून दोघांमध्ये वितुष्ट निर्माण झाले आहेत. काल रात्रीच्या सुमारास मेघराज तुपांगे आणि त्याच्या साथीदारांचा विकास म्हात्रे यांचे समर्थक प्रमोद चव्हाण आणि महेश चव्हाण यांच्यात पुन्हा जोरदार राडा झाला.

त्याचबरोबर पुन्हा रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास विकास म्हात्रे यांचे समर्थक प्रमोद चव्हाण, महेश चव्हाण मित्रा बरोबर गप्पा मारत असताना मोटर सायकलवरून आलेल्या मेघराज तुपांगे, उमेश भोईर, शत्रुघ्न भोईर, विशाल म्हात्रे, अशोक म्हात्रे यांच्यासह आणखी काही अनोळखी व्यक्ती हातात छोट्या तलवारी, लोखंडी रॉड घेऊन आले. तिथे येताच गप्पा मारणाऱ्या चव्हाण यांच्यासह इतरांना बेदम मारहाण केल्याची तक्रार अजय गोलतकर यांनी विष्णूनगर पोलीस ठाण्यात केली. तर आपण दुचाकीवरून घरी परतत असताना प्रमोद चव्हाण यांच्यासह चौघांनी अंधारात आपला रस्ता अडवून आपल्यावर धारदार हत्याराने हल्ला करत आपल्यासह इतरांना जखमी केल्याची तक्रार मेघराज तुपांगे यांनी केली आहे. या दोन्ही तक्रारीवरून पोलिसांनी परस्पर विरोधी गुन्हे दाखल करत अजय गोलतकर याच्यासह विरोधी गटातील शत्रुघ्न मढवी, विशाल म्हात्रे, अशोक म्हात्रे, या चौघांना अटक केली आहे. तर या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या प्रमोद चव्हाण आणि महेश चव्हाण याना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत .

> महत्त्वाचे

## कंपनीत ५.१० लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**सिडको ।** अंबड एमआयडीसीतील ईफिशीयंट मेथड कंपनीत काम करणाऱ्या अकाउंट असिस्टंटने तब्बल ५ लाख १० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, संशयित आरोपीविरुद्ध भा.दं.सं. कलम 316(4), 318(4) अन्वये कारवाई सुरू आहे. सुनिल रामदास पवार (वय ५६, रा. अशोकनगर, सातपूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी रविंद्र मिस्तरी (रा. सिडको, नाशिक) याने कंपनीच्या अकाउंट विभागात काम करत असताना दीप इंटरप्रायजेस या बनावट नावाने कंपनीच्या बँक खात्यातून आपली स्वतःची एसबीआय व कोटक महिंद्रा बँकेतील खाती लाभार्थी म्हणून नोंदवून कंपनीच्या पैशांची ऑनलाईन फसवणूक केली. हा प्रकार ५ ऑगस्ट २०२३ पासून ६ ऑगस्ट २०२४ या कालावधीत घडल्याचे तपासात स्पष्ट झाले असून, आरोपीने एकूण ५,१०,००० रकमेचा अपहार केला आहे. सध्या आरोपी फरार असून पोलीस निरीक्षक कांरडे व सहाय्यक पोलीस निरीक्षक मुगले अधिक तपास करत आहेत.

## उन्हाळी सुट्टीनिमित्त वारली चित्रसृष्टी कार्यशाळा

**नाशिक ।** उन्हाळी सुट्टीनिमित्त वारली चित्रशैली कार्यशाळेचे आयोजन करण्यात



आले आहे. दि.१ ते ३१ मे दरम्यान दररोज स्वतंत्र एक दिवसीय कार्यशाळा होईल. त्यामध्ये बेसिक वारली चित्रशैली शिकवण्यात येईल. सकाळी ११.३० ते दुपारी ४.३० या वेळेत प्रत्येक दिवशी कार्यशाळा होतील. पत्रकार व वारली चित्रशैली तज्ज्ञ संजय देवधर मार्गदर्शन करतील. गंगापूररोड व पाईप लाईन रोडजवळ डीजे रीवा मेडोज, सोमेश्वर - सातपूर लिंकरोड, सम्राट अपना घर शेजारी ही कार्यशाळा घेण्यात येणार आहे. १० वर्षांवरील मुली, युवती व सर्व वयोगटातील कलाप्रेमी महिला, पुरुषांना सशुल्क प्रवेश मिळेल. आवश्यक सर्व साहित्य, नोट्स व सर्टिफिकेट देण्यात येईल. येताना पेन्सिल, पाण्यासाठी छोटा बाऊल, पॅड, जुना रुमाल हे साहित्य बरोबर आणावे. प्रवेश मर्यादित असून फोन करुन सोयिस्कर तारीख ठरवणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ९४२२२७२७५५ या क्रमांकावर संपर्क साधून नावनोंदणी करावी, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## भाकप, सीआयटीयुतर्फे घरेलु कामगारांना भांडे वाटप

**चांदवड ।** येथे भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) व सीआयटीयुच्या वतीने सिटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्य उपाध्यक्ष डॉ. डी. एल कराड यांच्या हस्ते घरेलु महिला कामगारांना भांडे




वाटप करण्यात आले. यावेळी कॉ. सीताराम ठोंबरे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की या योजनेसाठी डॉ. कराड यांनी सिटू संघटने मार्फत संघर्ष केला आहे. त्या संघर्षातून आज आपणास फायदा झाला आहे. यावेळी याकर्यक्रमात पक्षाचे जिल्हा सचिव मंडळ सदस्य कॉ सिंधुताई शार्दुल, कॉ हणमंत गुंजाळ, कॉ गणपत गुंजाळ, तुकाराम गायकवाड, किसान सभेचे सेक्रेटरी, कॉ सारिका गुंजाळ, जनवादी महिला संघटना, कॉ शब्बीर सय्यद कॉ. युवराज पाटील, कॉ गौतम कोंगळे यांच्यासह चांदवड तालुक्यातील घरेलु महिला कामगार मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## निफाड होरायझन अकॅडमीत सेविकांना भेटवस्तू वाटप

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित निफाड येथील होरायझन अकॅडमीत महाराष्ट्र व कामगार दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांच्या हस्ते सर्व शिक्षकेतर कर्मचारी व सेविकांना भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी कैलास कोटकर यांनी ध्वजवंदन केले. यावेळी शालेय सेविका रंजना वडघुले व राजू बेंडकुळे यांनी कामगार दिनाचे महत्त्व विशद केले. प्रत्येक आस्थापनांमध्ये सेवकांचा वाटा किती महत्त्वाचा आहे व त्यांना सर्वांनी सन्मानपूर्वक वागणूक दिली पाहिजे हे मुख्याध्यापिका स्नेहल सोनवणे यांनी सांगितले. जयेश ढोमसे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सद्गुरु श्री शंकर महाराज...

अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ महाराज यांना शंकर महाराज गुरुस्थानी मानत. वैशाख शुद्ध अष्टमी 24 एप्रिल 1947 रोजी पुणे येथील धनकवडी पद्मावती येथे समाधी घेतली. 5 मे 2025 सोमवार रोजी वैशाख शुद्ध अष्टमी आहे. सदगुरु श्री शंकर महाराज यांचा 78 वा समाधी सोहळा सातारा रोड, धनकवडी, पुणे येथील मठात संपन्न होत आहे. निमित्ताने धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

सद्गुरु शंकर महाराज यांच्या शंकर गीता व शंकर बावनी या दोन पुस्तकात महाराजांचे लीला वर्णन आले आहे. त्यातूनच आपल्याला शंकर महाराजांविषयी बरीच माहिती मिळते. तसेच शंकर महाराजांच्या जीवनावर आधारित "साद देती हिमशिखरे" व 'अंतरीचा मागोवा' या जी.के.प्रधान लिखित दोन अध्यात्मिक पुस्तकातून बरीच माहिती मिळते. समाधी मंदिरातही ग्रंथ मिळतात. श्री शंकर महाराज अगदी अलीकडच्या काळात होऊन गेलेले सत्पुरुष. त्यांची समाधी मठ पुणे येथे सातारा रस्त्यावर धनकवडी भागात आहे. त्यांच्या समाधीचा दिनांक वैशाख शुद्ध अष्टमी शके १८६९ समाधीची अधिकृत नोंद आहे. पण बालपण, माता-पिता, शिक्षण, गुरू, साधना, शिष्य-संप्रदाय इत्यादींचा तपशील हवा तसा मिळत नाही. सोलापूर, अक्कलकोट, त्र्यंबकेश्वर, नाशिक, नगर, पुणे, हैद्राबाद, तुळजापूर, औदुंबर, श्रीशैल अशा स्थानी त्यांची भटकंती असायची. सांगितली एवढीच स्थाने असतील असेही नाही. म्हणजे शंकर महाराजांचे 'नाम-रूप-स्थान' सांगणे कठीण आहे. कारण खऱ्या अर्थाने ते वैराग्यसंपन्न होते. म्हणूनच 'शंकर' होते. शंकर महाराज अलौकिक पुरुष होत, हे चिकित्सक विद्वानांनाही मान्य होते. आचार्य अत्रे, न्यायरत्न विनोद यांच्यासारखे प्रकांड पंडित शंकर महाराजांना मानीत. हे विद्वान त्यांची योग्यता जाणून होते. महाराज म्हणत, 'मला जाती, धर्म काही नाही. ते स्वतः खरोखरीच सर्वांशी समभावाने वागत. श्री शंकर महाराजांनी मोठमोठी व्याख्याने, प्रवचने केली नाहीत. एखाद्या ग्रंथावर टीका लिहिली नाही. आलेल्या व्यक्तींना त्यांचे साधेसुधे मार्गदर्शन असे. महाराज म्हणतात,आचरण महत्त्वाचे, ग्रंथांचे वाचन नि अभ्यास आचरणात येईल तेवढाच खरा. ते म्हणत, 'भावनेने भिजलेले असेल, ते भजन'. त्यांनी अनेकांना सांगितले, 'माता-पित्याची सेवा करा. कुलदेवतेची आराधना करा. यापेक्षा अधिक काही नको.' श्री सदगुरु शंकर महाराज हे उंचीने फार कमी आणि जन्मतः अष्टावक्र व आजानुबाहू होते. त्यांचा उत्साह हा वाखाणण्यासारखा असे. नेहेमी सफेद धोती आणि सफेद शर्ट परिधान करून असत. खूप वाढलेले केस, दाढी मिशी आणि त्यातून डोकांवणारे अतिशय मोठे पण भेदक डोळे. प्रथमदर्शनी महाराजांचे वागणे एखादया लहान मुलाप्रमाणे वाटे. पण त्यांच्या चेहऱ्यावरचे तेज आणि योग सामर्थ्य लपत नव्हते. लहान मुलांप्रमाणे वागणारे आणि स्वतःला अज्ञानी आणि गांवढळ म्हणणारे महाराज जेव्हा बोलत तेव्हा मात्र भल्याभल्यांची तोंड बंद होत असत. स्वतःला अशिक्षित म्हणवणारे महाराजांचे जवळजवळ सर्वच भाषांवर प्रभुत्व होते. आलेल्या भक्ताच्या मायबोलीत ते त्याला उत्तर देत. त्यांचे हे प्रभुत्व फक्त भारतीय भाषेवरच नाही तर परदेशी भाषांवरपण होते, आलेल्या रशियन दांपत्याशी महाराजांनी अस्खलीत रशियन भाषेत संवाद साधला होता. हे न सुटलेले कोडे आहे. अक्कलकोट स्वामी समर्थांना शंकर महाराज आपले गुरु असे संबोधीत. आपल्या लहानपणी शंकर महाराज फार खोडकर आणि खट्याळ होते. एक दिवस एका हरिणाच्या पिल्लाचा पाठलाग करत करत ते एका अरण्यात पोहोचले. त्या घोर अरण्यात त्यांना एक शंकराचे जीर्ण देऊळ दिसले. ते हरणाचे पिल्लू सुद्धा त्या देवळात आश्रयाला लपले. त्या पिल्लाला बाण मारणार एवढयात शंकर महाराजांसमोर एक दिगंबर साधू आला. त्याने त्या हरणाच्या पिल्लाला उचलून आपल्या कुशीत घेतले आणि महाराजांना म्हणाला " कशाला मारतोस रे ह्याला, काय बिघडवले ह्याने तुझे". काही वेळाने त्या दिगंबर साधूने महाराजांच्या मस्तकावर हात ठेवला. ही त्यांची प्रथम "स्पर्शदिक्षा". महाराज त्या स्पर्शाने अगदी भारावून गेले. तो दिगंबर साधू म्हणजे अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज असे म्हणतात. पुण्याच्या डेक्कन कॉलेज मध्ये असणाऱ्या प्रोफेसर भालचंद्र देवांना महाराजाच्या वया विषयी कुतूहल होते. पुण्याच्या डॉ. धनेश्वर ह्यांना असेच महाराजांच्या वयाबद्दल संदेह होता. त्यांनी महाराजांची परवानगी घेऊन त्यांच्या काही मेडिकल टेस्ट करून घेतल्या. त्या टेस्टचा रिझल्ट आल्यावर डॉक्टराना भोवळ आली. रिझल्ट मध्ये महाराजांचे वय १५२ वर्षे आले. शंकर महाराजांचा आवडता नंबर होता १३. कारण विचारले असता ते म्हणत " सबकुछ तेरा, कुछ नाही मेरा" महाराज वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नावानी प्रसिद्ध आहेत. सातपुड्यात सुपड्या बाबा, खानदेशात कुवर स्वामी, वाघोद मध्ये गौरीशंकर, मध्यप्रदेशात लाहिरी बाबा. एवढेच काय पण परदेशात पण ते प्रसिद्ध आहेत. जपानमध्ये महाराजांचे असंख्य भक्त आहेत. संजीवनी मेडिकल कंपनीचे मालक परांजपे ह्यांच्याकडे शंकर महाराजांचे एक छायाचित्र आहे. जे एका जपानी चित्रकाराने काढले आहे.

प्रापंचिकांना त्यांचा परखड उपदेश असे. 'प्रपंचातील अडीअडचणी तुमच्या तुम्हीच सोडविल्या पाहिजेत. त्याच्यासाठी कोणाकडे जाणे योग्य नाही. शंकर महाराज समाधी ट्रस्ट च्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम ही राबविले जातात. मंदिरात आरती नंतर रोज प्रसाद वाटप होते. अनेक भक्तही प्रसाद वाटप करतात.







निमित्त

दिलीप देशपांडे
जामनेर, जिल्हा जळगाव
८९९९५६६९१७

# शहरी भारतात पॅसिव्ह स्मोकिंगचा वाढता धोका

निष्क्रिय धूम्रपान, ज्याला सेकंडहँड स्मोकिंग असेही म्हटले जाते, भारतातील शहरी केंद्रांमध्ये एक गूढ सार्वजनिक आरोग्य संकट बनत आहे. सक्रिय धूम्रपानाच्या धोक्यांचा तपशीलवार उल्लेख केला जात असला तरी, निष्क्रिय धूम्रपानाची धोका अनेकदा दुर्लक्षित केला जातो, जरी ती निःशुल्क धूम्रपान करणाऱ्यांसाठीच नाही, तर विशेषतः लहान मुलं, वृद्ध व्यक्ती आणि श्वसनाच्या समस्या असलेल्या लोकांसाठी गंभीर आरोग्य धोक्यांसह असते.



सार्वजनिक ठिकाणांतील अज्ञात धोका वाढत आहे. भारताच्या शहरी भागांमध्ये जवळपास प्रत्येक रस्त्याच्या कोपऱ्यावर सिगारेट विक्री स्टॉल्स दिसतात. हे अनौपचारिक धूम्रपान क्षेत्र बनतात, ज्या ठिकाणी लोक त्यांच्यासाठी इतरांचा विचार न करता धूम्रपान करत असतात. रहिवासी भागांमध्ये, विशेषतः लहान हॉटेल्स किंवा खाद्य स्टॉल्सजवळ, धूम्रपान करणारे लोक गट करून धूम्रपान करत असतात, त्यामुळे संपूर्ण वस्तीला विषारी धुराचा सामना करावा लागतो. सकाळी आणि संध्याकाळी धावणारे, चालणारे, रस्त्यावर वाणिज्य करणारे आणि रोजंदारी करणारे लोक या धुराचे अनिवार्य पीडित बनतात. उदाहरणार्थ, मुंबईच्या उपनगरातील भागांमध्ये, चहा विक्री स्टॉल्सच्या बाहेर धूम्रपान करणारे लोक पाहायला मिळतात, ज्यामुळे पादचारी आणि स्थानिक रहिवाशांना धोक्याचा सामना करावा लागतो. दिल्लीमध्ये, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यावर बंदी असली तरीही, मेट्रो स्थानकांच्या बाहेर किंवा ढाब्यांमध्ये लोकांनी धूम्रपान करताना अनेकदा नियमांचे उल्लंघन होते. नाशिकमध्ये सध्या सार्वजनिक ठिकाणांवर निष्क्रिय धूम्रपानाचा धोका झपाट्याने वाढत आहे. शहराच्या अनेक भागांमध्ये - एमजी रोड, कॉलेज रोड, पंचवटी आणि कॅनडा कॉर्नर यांसारख्या ठिकाणी - सिगारेट स्टॉल्सवर लोक मोठ्या प्रमाणात धूम्रपान करत आहेत, विशेषतः संध्याकाळी. गंगापूर रोड, इंदिरा नगर, आडगांव आणि औरंगाबाद नाका यांसारख्या ठिकाणी छोटे हॉटेल्स, चहा स्टॉल्स आणि पानाच्या दुकान्यांबाहेर गट करून धूम्रपान करणे सामान्य बाब बनली आहे, ज्यामुळे शाळेतील मुलं, वृद्ध नागरिक आणि महिलांना हानिकारक धूर सहन करावा लागतो. लोक हॉटेल्समधील चहा पिण्यासाठी थांबल्यावर लगेच धूम्रपान करणे आणि इतरांना निष्क्रिय धूम्रपानाच्या संपर्कात आणणे आता सामान्य झालं आहे. नाशिक महानगरपालिका आणि स्थानिक प्रशासनाने जरी काही जागरूकतेचे उपक्रम घेतले असले तरी, नियमांची अंमलबजावणी अजूनही अपुरी आहे. सार्वजनिक धूम्रपानासाठी ठरवलेल्या क्षेत्रांची कमी आहे, आणि नागरिकांना दुसऱ्यांच्या सवयींमुळे होणारे परिणाम सहन करावे लागतात.

**- कीर्ती रणशूर**

### निष्क्रिय धूम्रपानाचे आरोग्यावर होणारे परिणाम

जागतिक आरोग्य संघटना (WHO) नुसार, निष्क्रिय धूम्रपान दरवर्षी १.२ मिलियन अत्यंत पूर्वी मृत्यूचे कारण ठरते. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) नेही शहरी लोकांमध्ये श्वसनाच्या इन्फेक्शन्स आणि हृदयविकारांच्या वाढत्या प्रकरणांबद्दल इशारा दिला आहे, ज्याचे मुख्य कारण पर्यावरणीय आणि दुसऱ्या हाताच्या धूराच्या संपर्कात येणे असू शकते. जी मुलं धूम्रपान जास्त असलेल्या भागात राहतात, त्यांना अस्थमा आणि ब्रॉन्कायटिससारख्या श्वसनाच्या समस्यांची अधिकता असू शकते. वृद्ध लोक आणि गर्भवती महिलांसाठी विशेष धोका आहे, त्यांना हृदयविकाराचा धोका आणि गर्भधारणेतील जटिलता येऊ शकतात.

### कायमचं कायदे का पुरेसे नाहीत?

भारतामध्ये सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानावर बंदी घालणारा 'सिगारेट्स आणि इतर तंबाखू उत्पादने कायदा (COTPA), 2003' अस्तित्वात आहे. तथापि, या कायद्याची अंमलबजावणी कमकुवत आहे. शहरी भागांमध्ये "सार्वजनिक" आणि "खासगी" यामधील फरक धूसर होतो, उदाहरणार्थ, छोटे खाणे विकणारे स्टॉल्स, रस्त्यावरील विक्रेते आणि अर्धे खुले सार्वजनिक ठिकाणे यावर तर्कशुद्ध नियंत्रण नसते. तसेच, दुकानदार ग्राहकांना धूम्रपान थांबवायला कमी इच्छुक असतात, किंवा व्यवसाय गमावण्याची भीती किंवा जागरूकतेच्या अभावामुळे ते ते करीत नाहीत. नगरपालिकाही सामान्यतः या नियमांची अंमलबजावणी करण्यास अपयशी ठरतात.

### निष्कर्ष-

निष्क्रिय धूम्रपाना-विरुद्धचा लढा भारतात केवळ कायदेशीर नाही, तर सामाजिक आहे. धूम्रपानाला एक वैयक्तिक निवड म्हणून न पाहता, एक सार्वजनिक आरोग्य धोका म्हणून पाहणे आवश्यक आहे. यशस्वी बदल होण्यासाठी, आपल्या शहरांचा परत दावा करणं आवश्यक आहे. केवळ प्रदूषण आणि ट्रॅफिकपासूनच नाही, तर दुसऱ्या हाताच्या धूराच्या अदृश्य हानिपासूनही. सार्वजनिक आरोग्य नेहमीच इतरांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या व्यक्तिगत सवयींपेक्षा महत्त्वपूर्ण असावा!

### काय करणे आवश्यक आहे?

निष्क्रिय धूम्रपानाच्या वाढत्या संकटाचा सामना करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात याव्यात- धूम्रपान बंदीचे कडक पालनः प्रशासनाने अधिक तपासणी वाढवली पाहिजे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक दंड लावले पाहिजेत. शाळा, रुग्णालयं आणि रहिवासी भागांजवळील क्षेत्रांत अशा तपासण्या केल्याने परिणाम होऊ शकतात. रहिवासी भागांमध्ये धूम्रपान मुक्त क्षेत्रेः स्थानिक नगरपालिकांना आणि रेसिडेंशियल सोसायट्यांना राहिवासी भागांमध्ये धूम्रपान मुक्त क्षेत्रे जाहीर करण्यासाठी एकत्र काम करावे लागेल. धूम्रपान करणाऱ्या लोकांसाठी ठराविक क्षेत्रे आणि त्या क्षेत्रांची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. जागतिक जागरूकता मोहीमः सार्वजनिक जागरूकता मोहिमा, स्थानिक भाषांमध्ये, निष्क्रिय धूम्रपानाच्या हानिकारक परिणामांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. व्हिज्युअल चेतावणी आणि वास्तविक जीवनाच्या गोष्टी जास्त प्रभावी ठरतात. रहिवासी भागांजवळ सिगारेट विक्रीवर बंदीः सिगारेट विक्रेत्यांना परवाने देणे आणि त्यांची शाळा, रुग्णालयं आणि रहिवासी क्षेत्रांपासूनचे अंतर नियंत्रित करणे. समुदायाच्या सजगतेचा प्रोत्साहनः नागरिकांनी धूम्रपान विरोधी वर्तवणूक पद्धतींमध्ये सक्रियपणे भाग घेणे आणि नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी प्रत्यक्ष भूमिका घ्यावी. तरुण वर्ग आणि शाळांना सहभागी करणेः विद्यार्थ्यांना तंबाखूविरोधी शिक्षण आणि समुदाय कार्ये देऊन त्यांच्या मनामध्ये जागरूकता निर्माण करणे.

## पिंपळगाव एसटी आगारात पाच नवीन बसगाड्या दाखल

**पिंपळगाव बसवंत ।** जिल्ह्यातील सर्वाधिक उत्पन्न मिळवून देणाऱ्या पिंपळगाव एसटी आगारात पाच नवीन बसेस दाखल झाल्याने या नवीन बसेसच्या शुभारंभ निफाड मतदार संघाचे आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार दि.(३) रोजी नारळ वाढवून करण्यात आला.शुभारंभ होताच आमदार बनकर यांच्यासह उपस्थित महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना सजविण्यात आलेल्या या लालपरी बसमधून चक्कर मारण्यात येऊन अनोखी सफर घडविण्यात आली.

निफाड, दिंडोरी, चांदवड या तीन तालुक्याच्या दृष्टीने पिंपळगाव एसटी आगर हे प्रवाशी वर्गाच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने निफाड मतदार संघाचे आमदार दिलीप बनकर यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पिंपळगाव एसटी आगारासाठी १५ नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. प्रताप सरनाईक यांनी दहा बसेसची मागणी पूर्ण करत पहिल्या टप्यात पाच नवीन बसेस पिंपळगाव आगाराला उपलब्ध करून दिल्या. तर उर्वरित पाच बसेस येत्या आठ दिवसात उपलब्ध होणार असल्याने प्रवाशी वर्गाची गैरसोय दूर होईल. शिवाय पिंपळगाव एसटी आगर कॉक्रीटीकरणचा प्रस्ताव देखील शासनस्तरावर पाठवण्यात आला असल्याची माहिती आ. बनकर यांनी देत पिंपळगाव एसटी आगाराने विद्यार्थी व प्रवाशी यांची तक्रार येणार नाही, यासाठी प्रवाशी वर्गाला चांगली सेवा देण्याच्या सूचना केल्या. याप्रसंगी नाशिकचे विभाग नियंत्रक किरण भोसले, दिलीप मोरे, सतीश मोरे, बापूसाहेब पाटील, बाळासाहेब बनकर, सुरेश खोडे, संजय मोरे, किरण लभडे, गणेश बनकर, सोमनाथ मोरे, संजय हंडोरे, राजेंद्र खोडे, नवनाथ डोखळे, संदीप कुयटे, पिंपळगाव एसटी आगार प्रमुख मनोज गोसावी, वाहतूक निरीक्षक योगिता बेडसे आदिंसह महायुतीचे पदाधिकारींसह वाहक, चालक उपस्थित होते.

# पिंपळगावी राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज यांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा जल्लोषात

**पिंपळगाव बसवंत ।** पिंपळगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराजनगरमध्ये श्री संत जनार्दन स्वामी मित्रमंडळाच्या पुढाकाराने राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांचे भव्य दिव्य मंदिर उभारले. मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी विविध कार्यक्रम या शिवाजीनगर मध्ये संपन्न झाले प्रारंभी संत जनार्दन स्वामी महाराज यांची मूर्ती, शिवलिंग नंदी व गणेशमूर्ती मिरवणूक संपन्न झाली आणि याचा प्राणप्रतिष्ठा सोहळा महामंडलेश्वर स्वामी शिवगिरी महाराज यांच्या हस्ते मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात संपन्न झाला. गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या या विविध धार्मिक कार्यक्रमात पूजा, होमहवन, मूर्ती व कलश स्थापना संपन्न झाली . त्यानंतर गुरुदेव श्री त्यागी महाराज ओंकारेश्वर यांचे प्रवचन व महाआरती होऊन हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री संत जनार्दन स्वामी मित्रमंडळाने अथक परिश्रम घेतले. यादरम्यान संत जनार्दन स्वामी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत पहिल्यांदाच हा मोठ्या जल्लोषात हा धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला आणि याही पुढे येथे मोठ्या उत्साहात धार्मिक कार्यक्रम संपन्न होतील असे निफाड तालुक्याचे आमदार दिलीपराव बनकर यांनी सांगितले.

### प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात यांची प्रमुख उपस्थिती

श्री 1008 महामंडलेश्वर स्वामी शिवगिरिजी महाराज, तसेच आणा महाराज व गवारे महाराज,खासदार भास्कराव भगरे, आमदार दिलीप बनकर, माजी आमदार अनिल आणा कदम, माजी सरपंच भास्कर बनकर, दिलीप नाना मोरे, सतिष मोरे, बापू पाटील,गणेश बनकर, सुजीत मोरे आदी उपस्थित होते.कार्येक्रम यशस्वी रीत्या पार पाडण्यास सचिन देशमाने व जय जनार्दन भक्त परिवार पिंपळगाव बसवंत यांनी प्रयत्न केले.

## महत्त्वाचे

### दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटचा बुधवारी स्नेहमेळावा, फॅशन शो

**नाशिक ।** नाशिक व्यवसाय विद्या प्रसारक मंडळ संचलित दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूट ही शहरातील ख्यातनाम संस्था आहे. बुधवारी दि. ७ रोजी स्नेहमेळावा व पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. कॉलेजरोडच्या गुरुदक्षिणा सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम होईल. यावेळी खास फॅशन शो सादर करण्यात येणार आहे. संस्थेला यंदा ८८ वर्षे पूर्ण झाली असून दिमाखदार वाटचाल सुरु आहे.संस्थेने आतापर्यंत अनेक महिला, युवकांना त्यांच्या पायावर उभे करून त्यांचे संसार मार्गी लावण्यास मदत केली. स्नेहमेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून कृषिमंत्री ना. माणिकराव कोकाटे, लोकप्रिय अभिनेते व सामाजिक कार्यकर्ते चिन्मय उदगीरकर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अॅड. अविनाश भिडे, उपाध्यक्ष दिलीप डोंगरे, कार्यवाह मानसी देशमुख यांनी दिली. सर्वांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन कोषाध्यक्ष अरुण पैठणकर तसेच संचालक मंडळ सदस्य बाळकृष्ण कुलकर्णी, सुभाष सबनीस, सुधाकर पोळ, सुहास शुक्ल, चारुशीला शिंगणे, निलेश देशपांडे व सहकाऱ्यांनी केले आहे.

### 'यशवाणी'वर विज्ञान- गणित संकल्पना काव्य वाचन

**नाशिक ।** येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी' वेबरेडिओवर विज्ञान गणितातील सूत्र-संकल्पनांवर आधारित काव्याचे वाचन करण्यात आले. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या कल्पक मार्गदर्शनानुसार हा सहावा ऑनलाईन कार्यक्रम होता. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी विज्ञान व गणितीय सूत्र- संकल्पना काव्याचे अध्यापनातील महत्व विषद केले. या कार्यक्रमात कवयित्री मनीषा पाटील यांनी शोध व संशोधक, जैवतंत्रज्ञान, गणितीय संच आदी तर कवी डॉ. राजेंद्र बगाटे यांनी विज्ञानाचे साक्षात्कार, विद्युत प्रभार, विज्ञान थोरवी आदी कविता सादर केल्या. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रकाश सापनर व गिरीश गवळी यांनी या कार्यक्रमासाठी तंत्रसहाय्य केले.




# अखेर मुख्याधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभाराचा भोपळा फुटला!

## दै. महासागरचा दणका 'लाडक्या' ठेकेदाराने रातोरात केली हजारो झाडे गायब

**नाशिक ।** त्र्यंबकमध्ये माझी वसुंधरा योजने अंतर्गत परिसरात लावण्यासाठी आणलेली हजारो झाडांची रोपटे अक्षरशः मरून पडल्याचे वृत्त दै. महासागर मध्ये प्रसिद्ध होताच संबंधित 'लाडक्या' ठेकेदाराने जनार्दन स्वामी मंदिराजवळ दडपलेली हजारोंच्या संख्येने झाडांची रोपटे ट्रॅक्टरने रातोरात गायब केली. मृत झाडे गायब करून ठेकेदाराने आपल्या पापाचा पुरावा नष्ट करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. त्यामुळे माझी वसुंधरा योजनेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचे उघड होत असून मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांच्या भ्रष्ट कारभाराचा भोपळा फुटला आहे.

त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी देवचक्के यांच्या वादग्रस्त कारभारामुळे त्र्यंबक नगर परिषदेच्या अब्रूची लक्तरे अक्षरशः वेशीवर टांगली गेली आहे.त्यातच माझी वसुंधरा योजनेत झालेल्या गैरप्रकाराला दै. 'महासागर'ने वाचा फोडल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणाचा बुरखा फाटला आहे. माझी वसुंधरा योजनेअंतर्गत वृक्षारोपणाचे काम शासन नियमानुसार झाले नसून कागदोपत्री हजारोंच्या संख्येने दाखविण्यात आलेली झाडे प्रत्यक्षात मात्र दिसून येत नसल्याने या योजनेच्या अडून शासकीय निधी संगणमताने हडप केल्याचा आरोप केला जात आहे. काम दाखविण्यासाठी काही ठिकाणी लावलेली झाडे पाण्याअभावी अक्षरशः मरून पडली आहेत. बहुतांश ठिकाणी केवळ रिकाम्या जाळ्या दिसत असून झाडांची देखील अक्षरशः दुर्दशा झाली आहे.

त्र्यंबकेश्वर परिसरात माझी वसुंधरा योजने संदर्भात दै. महासागर ने आढावा घेतल्यानंतर अनेक धक्कादायक बाबी उघडकीस आल्या आहेत. वर्षभरापूर्वीच लावलेल्या झाडांची दुरावस्था बघितल्यानंतर नगरपरिषदेच्या निधीवर लाडका ठेकेदार पोसला जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. माझी वसुंधरा योजनेचे काम घेतलेल्या खऱ्या कंत्राटदाराची




### माझी वसुंधरा योजनेचा फज्जा

वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात येऊन शासकीय निधी वसूल करण्याची मागणी केली जात आहे. खरे तर या योजनेचे काम

> **त्र्यंबक परिसरातील शेतकरी फुकट गाळ काढून नेण्यास तयार असताना तब्बल ४ कोटी रुपये खर्चून अहिल्या धरणातील गाळ काढण्याचा अट्टाहास नेमका कुणासाठी.. ठेकेदाराच्या आडून कोण खात आहे मलई वाचा लवकरच...**

देखील नगर परिषदेच्या लाडक्या ठेकेदारानेच केले असून मुख्याधिकाऱ्यांचा थेट वरदहस्त लाभल्याने आपले कुणीच काही करू शकत नाही अशी या ठेकेदाराची मानसिकता झाल्याचे बोलले जाते. मुळात हा लाडका ठेकेदार केवळ नावालाच असून त्याच्या आडून नेमकी ही कंत्राटे कोण घेत आहे, याबाबत नागरिकांमध्ये उलट-सुलट चर्चा आहे. त्यामुळे झाडे गायब करण्याचा आदेश ठेकेदाराला नेमका कोणी दिला याची देखील चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

दरम्यान नैसर्गिक संपत्तीचे नुकसान करणाऱ्या माजुरड्या ठेकेदाराच्या कुटील कारस्थानाचा दै 'महासागर'ने बुरखा फाडल्यानंतर त्रंबक मध्ये उलट सुलट चर्चा सुरू आहे. या ठेकेदाराने ट्रॅक्टर लावून सगळीच रोपटे गायब करून आपल्या पापाचा पुरावा नष्ट केल्याचा प्रयत्न केला असून ठेकेदाराच्या पापात अप्रत्यक्षरीत्या मुख्याधिकारांचा सहभाग असल्याचे स्पष्ट होत आहे.त्यामुळे याप्रकरणी शासनाच्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्याची मागणी केली जात असून काही सामाजिक संस्था देखील मुख्याधिकाऱ्यांच्या बेताल कारभाराविरुद्ध पुढे सरसावल्या असून नगरपरिषदेतील भ्रष्ट कारभाराबाबत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली जाणार असल्याचे समजते.

> **त्र्यंबक नगर परिषदेबाबत कुठली तक्रार असल्यास संपर्क साधावा. मो. 9699990554.**

# वादग्रस्त अधीक्षक भाऊलाल शेळकेंविरुद्ध अद्याप कारवाई नाहीच

## सिंचन विभागातील वरिष्ठांकडून पाठराखण

**नाशिक ।** सिंचन विभागातील अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयात अधीक्षक पदावर कार्यरत असलेले भाऊलाल शेळके हे पैसे घेऊन बदल्या करीत असल्याची गंभीर तक्रार मुख्य अभियंता यांना प्राप्त होऊन देखील त्यांच्यावर कुठलीही कारवाई केली जात नाही. किंबहुना या प्रकरणाची साधी चौकशी देखील करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेळके यांच्या भ्रष्टाचाराला वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पाठबळ आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

सिंचन विभागातील सरळ सेवा भरती प्रक्रियेत आपल्याच नातलकांसह जवळपास ९५ कर्मचाऱ्यांची नियमबाह्य पद्धतीने निवड केल्याचा ठपका भाऊलाल शेळके यांचे विरुद्ध ठेवण्यात आला होता. याप्रकरणी सिंचन विभागातील उच्च पदस्थ अधिकारी अडकले असल्याने हे प्रकरण दाबले



गेले. असे असताना शेळके यांचे नाव आजही त्याबाबत चर्चेत आहे. चौकशीच्या नावाखाली शेळके गेल्या सात ते आठ वर्षांपासून अधीक्षक अभियंता यांच्या कार्यालयातील एकच पदावर नियमबाह्य पद्धतीने ठाण मांडून बसले असून सिंचन विभागातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे सूत्र त्यांच्याच हाती असल्याने दरवर्षी बदल्यांमध्ये त्यांनी मोठी माया जमविल्याचे तक्रारीत म्हटलेले आहे. श्री शेळके यांच्याबाबत केलेल्या तक्रारीत सिंचन विभागातील विविध पदांवरील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत किती व कसे पैसे घेतले जातात याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. याबाबत पुरावा म्हणून ऑडिओ रेकॉर्डिंग देखील अस्तित्वात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे शेळके यांच्या विषयी स्पष्ट तक्रार असताना अधीक्षक अभियंता यांच्याकडून कुठलीही कारवाई केली जात नसल्याने शेळके यांच्या भ्रष्टाचारात अधीक्षक अभियंता यांचा सहभाग आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. त्यामुळे बदली नाही तर शेळके यांच्या विरुद्ध थेट निलंबनाची कारवाई करावी अन्यथा याप्रकरणी सिंचन भावना समोर उपोषणाला बसण्याचा इशारा तक्रारदाराने दिला आहे.

# ईडीचा धोका आणि वास्तव यात मोठा फरक : अॅड. उज्ज्वल चव्हाण

**नाशिक ।** मनी लॉन्ड्रिंग म्हणजेच काळा पैसा पांढरा करण्याची प्रक्रिया. मात्र ज्या व्यक्तीकडे काळा पैसा आहे त्यांना सोडून केवळ सरकार बदलण्यासाठी होणाऱ्या ईडीच्या (अंमलबजावणी संचालनालय) कारवाया या कायद्याच्या चौकटीत बसत नाहीत, असा स्पष्ट सूर अॅड. उज्ज्वल कुमार चव्हाण यांनी व्यक्त केला.

गोदाघाटावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेच्या तिसऱ्या दिवशी स्व. अशोकराव देशमुख स्मृती व्याख्यानात "हे ईडी ईडी काय आहे?" या विषयावर ते बोलत होते. व्यासपीठावर एम.एस. एल. ड्राईव्ह लाईनचे कार्यकारी संचालक भूषण श्रीधर पटवर्धन, महाव्यवस्थापक हेमंत राख, कुणाल कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. अॅड. चव्हाण म्हणाले, "ईडी हा शब्द ऐकला की भीती वाटते, पण कोणताही पैसा जवळ ठेवला की ईडी येते, हा भ्रम आहे. योग्य मार्गाने मिळवलेला व कर भरून जपलेला पैसा ईडीच्या कक्षेत येत नाही. काही मोठ्या शेतकऱ्यांकडे शेतीतून प्रचंड पैसा येतो, परंतु वेळच्या वेळी कर भरल्यास त्यांच्यावर कारवाई होणार नाही." पुढे बोलताना त्यांनी सांगितले, "गैरमार्गाने मिळालेला पैसा जर कोणी कायदेशीर दाखवण्याचा प्रयत्न करत असेल तर ईडीकडे कारवाई करण्याचा अधिकार आहे." या कायद्याची पार्श्वभूमी सांगताना त्यांनी स्पष्ट केले की,



याची सुरुवात अमली पदार्थविरोधी कायद्यातून झाली. आज मात्र अनेक वेळा हा कायदा केवळ राजकीय हत्यार म्हणून वापरला जात असल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. कार्यक्रमाची सुरुवात स्व. अशोकराव देशमुख यांच्यावर आधारित चित्रफितीने झाली. माजी नगरसेवक तानाजी जायभावे यांच्या हस्ते अॅड. चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. अॅड. अजय निकम यांनी परिचय करून दिला, तर अध्यक्षीय भाषण श्रीकांत बेणी यांनी केले. आभार प्रदर्शन भूषण काळे यांनी केले. व्याख्यानानंतर एम.एस.एल. ड्राईव्ह लाईन प्रस्तुत हिंदी गीतांचा सुरेल कार्यक्रम झाला, ज्यात पंकज उधास आणि गाता रहे मेरा दिल यांसारखी गाणी सादर करण्यात आली.




### नाशिकमध्ये अनेक ठिकाणी कमी दाबाने पाणी

**नाशिक ।** सध्या कडक उन्हाळा असल्याने पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातच अनेक ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात, कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने शहरात अघोषित पाणीबाणी सुरू झाल्याचे चित्र आहे. अद्याप शहरात तीव्र पाणी टंचाई जाणवत नसली तरी पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे नागरिकांना उपलब्ध पाणी पुरेसे होत नसल्याचे चित्र आहे. नाशिक धरण समूहात समाधानकारक पाणीसाठा नसला तरी योग्य नियोजनाने मान्सून सुरू होईपर्यत पाणी पुरवठा केला जाऊ शकतो. महापालिकेने या सर्व बाबींचा विचार करत पाण्याचे नियोजन केले आहे त्यामुळे शहरात काही ठिकाणी कमी दाबाने तर कमी वेळ पाणीपुरवठा होत असावा. इतर शहर व महानगर यांच्या तुलनेत नाशिकला पाण्याचे हाल नाही. मान्सून जर वेळेवर आणि पुरेसा बरसला नाही तर मात्र शहरातही पाणी टंचाई निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनीही पाणी जपून आणि गरजे पुरते वापरणे आवश्यक आहे.

### मनपाची माझी वसुंधरा मोहीम

**नाशिक ।** महानगरपालिकेने नंदिनी स्वच्छतेसाठी वसुंधरा सप्ताह स्वच्छता मोहीम उत्साहात राबवली. "माझी वसुंधरा सप्ताह" साजरा करताना "वसुंधरा वाचवा, वसुंधरा सजवा" या ब्रीदवाक्यानुसार "माझी नंदिनी, माझी जबाबदारी" ही विशेष नदी स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबवली. महापालिका नदी संवर्धनासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी आयुक्तांनी स्पष्ट केले.

# पुणेगाव कालव्याच्या भूसंपादनावरच प्रश्नचिन्ह

## आठ कोटींचे बिल अदा केल्याचे दस्त 'महासागर'च्या हाती

**नाशिक ।** सिंचन विभागातील वादग्रस्त पुणेगाव कालव्या संदर्भात काही धक्कादायक बाबी उघडकीस आल्या असून चांदवड तालुक्यातील बहादुरी गावात चुकीच्या पद्धतीने भूसंपादन झाल्याचा आरोप करत बहुतांश ठिकाणी खाजगी मिळकतीवर कालव्याचे काम करण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे आता कालव्याच्या भूसंपादनावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. भूसंपादन एकीकडे आणि कालवा दुसरीकडे असल्यामुळे या कालव्याच्या संदर्भातील कामांसाठी गावागावात विरोध केला जात आहे. कालव्याच्या भूसंपादनासंदर्भात चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

पुणेगाव डाव्या कालव्याच्या माती काम व अस्तरीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात प्रलंबित असताना वादग्रस्त कार्यकारी अभियंता मनोजकुमार डोकचोळे आणि उपअभियंता योगिता घुगे यांनी ठेकेदाराशी संगणमत करत महामंडळाला तब्बल १२ कोटी रुपयांची बिल सादर केले. यापैकी ८ कोटी रुपयांचे बिल काढून घेण्यात या




अधिकाऱ्यांना यश आले. याप्रकरणी बरेच वादळ उठल्यानंतर आता या कालव्याच्या भूसंपादंबाबतच संशय निर्माण झाला असून त्यामुळे पुणेगाव कालवा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

चांदवड तालुक्यातील बहादुरी या गावात कालव्याच्या कामावरून बरेच वादळ उठले. या ठिकाणी पुणेगाव शाखेला काम करण्यास ग्रामस्थांनी मज्जाव केला तर बाकीच्या ठिकाणी पोलीस बाळाचा वापर करीत कामे रेटून नेली आहेत, असे असताना बहादुरी गावासह

**पुणेगाव डावा कालवा**
**पंचनामा**
**सुधीर उमराळकर**

काही भागात भूसंपादन प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने राबवली गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.अनेक ठिकाणी भूसंपादनाबाबत वाद उपस्थित झालेले असताना अधिकाऱ्यांनी गरीब शेतकऱ्यांवर बळाचा वापर करीत काम करून घेतल्याचे बोलते जाते. या कालव्याचे काम संपादित क्षेत्रावर न करता भलतीकडेच कालवा तयार केल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत असताना पुणेगाव शाखेकडून अस्तरीकरणाचे काम हाती घेतल्याने शेतकऱ्यांचा पारा अधिकच वाढला आहे. त्यामुळे या कालव्याच्या बाबतीत भविष्यात न्यायालयीन वाद उपस्थित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान या कामाच्या संदर्भात महामंडळाकडून वितरित झालेला देवकांचा निधी व एलओसी दै. 'महासागर'च्या हाती लागली असून यामध्ये ८ कोटी रुपयांचे बिल संबंधित वादग्रस्त ठेकेदाराच्या नावावर अदा करण्यात आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कामे प्रलंबित असताना अधिकाऱ्यांनी ठेकेदाराच्या मदतीने संबंधित बिल काढून घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

> **सिंचन विभागाशी संबंधित कुठलीही तक्रार असल्यास मो. ८६०५३८४९२५ या नंबरवर संपर्क साधावा.**



# जातनिहाय जनगणना, एक गेमचेंजर...

**राष्ट्रनामा**



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या पर्यटकांच्या हत्याकांडानंतर भारत-पाकिस्तानच्या सरहद्दीवर युद्धाचे ढग जमा झाले आहेत. भारतीय सैन्य दलाकडून पाकव्याप्त काश्मीरमध्ये पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक होणार की, कठोर निर्बंध लादून भारत सरकार पाकिस्तानची कोंडी करणार असे मंथन चालू आहे. सारा देश पाकिस्तानच्या विरोधात मुठी आवळत असताना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या राजकीय व्यवहार समितीने आगामी जनगणना करताना देशात जातनिहाय गणना होईल असा मोठा निर्णय जाहीर केला. केंद्र सरकारचा हा निर्णय गेमचेंजर ठरू शकतो. जातनिहाय जनगणनेचे सर्वेक्षण धोरण ठरवताना व निर्णय घेताना सरकारला दिशा दिग्दर्शनासाठी उपयुक्त ठरू शकते. अन्न सुरक्षा, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम आणि मतदारसंघांचे परिसीमन अशा योजनांची अंमलबजावणी करताना जातनिहाय जनगणनेची आकडेवारी हा मोठा आधार होऊ शकतो. कल्याणकारी योजना आखताना, संशोधन क्षेत्रात आणि आरक्षणाचे धोरण ठरवताना जातनिहाय गणनेची आकडेवारी लक्षात घेऊनच सरकारला निर्णय घ्यावे लागतील. केंद्रीय मंत्रिमंडळच्या राजकीय व्यवहार समितीचे अध्यक्ष स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल असे दिग्गज या समितीवर आहेत. म्हणूनच या समितीने जातनिहाय जगगणना करण्याचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक आहे.

भारतात २०११ नंतर जनगणना झालेली नाही. सन २०२१ मधे जनगणना होणे अपेक्षित होते, पण कोविडच्या संकटाने देश ग्रासल्याने जनगणना होऊ शकली नाही. भारत सरकारने जातनिहाय जनगणना असा आदेश यापूर्वी कधीही दिलेला नव्हता. तत्कालीन केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी तर दि. २० जुलै २०२१ रोजी लोकसभेत एका प्रश्नाला दिलेल्या उत्तरात म्हटले होते की, केंद्र सरकारने अनुसुचित जाती व जनजाती वगळता अन्य कोणत्याही जातीची गणना करण्याचा आदेश दिलेला नाही. जातनिहाय गणना झाली तरच देशात कोणत्या जातीचे किती लोक आहेत हे निश्चित समजू शकेल व सरकारला त्या जातीच्या कल्याणासाठी निश्चित आकडेवारीचा उपयोग होऊ शकेल. जनगणना केल्यावर देशात अनुसुचित जाती जमातीची लोकसंख्या किती आहे हे समजू शकेल.

प्रादेशिक अस्मिता व जातीवर आधारीत व्होट बँक यावर विविध राज्यात प्रादेशिक पक्ष काम करीत आहेत. व्होट बँक राजकारणात आपल्या जाती वा समाजाचे लोक मोठ्या संख्येने आहेत असे दावे त्यांचे नेते नेहमीच करीत असतात. पण जातनिहाय गणनेमुळे कोणत्या जातीची किती लोकसंख्या आहे हे निश्चित समजू शकेल. शिवाय जातीच्या आधारावर केल्या जाणाऱ्या संकुचित राजकारणाला पायबंद बसू शकेल. मंडल आयोगाच्या शिफारसी व्ही. पी. सिंग यांच्या कारकिर्दीत सरकारने स्वीकाल्यानंतर जातीपातीच्या राजकारणाला आणखी वेग आला. आमच्या जातीला व समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीसाठी प्रत्येक राज्यात आंदोलने सुरू झाली. आरक्षणातून सरकारी नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत ही भावना दृढ झाली. जातीच्या आधारावर सरकारी नोकरी मिळू शकते व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळू शकतो असे मागास व उपेक्षित समाजातील लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न झाला. १९९० मध्ये मंडल आयोगाच्या शिफारसी लागू झाल्यावर वेगवेगळ्या जाती-समाजांकडून आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलने सुरू झाली. मंडल आयोगाच्या शिफारसींनंतर देशातील निवडणुकीच्या राजकारणाला वेगळी दिशा मिळाली. भाजपाच्या हिंदुत्वाच्या मुद्याने जातीच्या राजकारणाला शह देण्याचा जरूर प्रयत्न केला पण जातनिहाय गणना झाली, तर हिंदू मतदारांचे विभाजन होण्याचाही धोका आहे, असेही काहींना वाटते.

गेल्या वर्षी महाराष्ट्र व अन्य काही राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभांमधे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या भाषणातून एक है तो सेफ है अशा घोषणा देत होते, त्याला लोकांकडूनही जोरदार प्रतिसाद मिळाला. मग जातनिहाय गणना करण्यासाठी मोदी अचानक तयार कसे झाले ? जातनिहाय गणनेपासून दूर राहण्यासाठी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयापुढे आजवर विविध कारणे सांगितली होती. बिहारमधे झालेल्या जातनिहाय गणनेला भाजपाने उघड विरोध केला होता. बिहारचे मुख्यमंत्री नितिश कुमार यांनी पुढाकार घेऊन राज्यात जातनिहाय सर्वेक्षण केले. त्यानंतरही नितिश कुमार एनडीएमध्ये भाजपाबरोबर आहेत. राज्यातील जातनिहाय सर्वेक्षणानंतर बिहारला जाऊन मोदी यांनी नितिश कुमार यांचे जाहीरपणे कौतुक केले. जातनिहाय गणनेचे महत्त्व मोदी सरकारलाही उशीरा का होईल समजले, अशी प्रतिक्रिया विरोधी पक्षातून उमटली आहे. काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या निर्णयाबाबत मोदी सरकारचे अभिनंदन केले आहे. जातनिहाय गणना करायला काँग्रेस व विरोधी पक्षांनी सरकारला भाग पाडले असा प्रचारही सुरू झाला आहे. आता देशात प्रथमच जातनिहाय जनगणना होणार आहे.

या वर्षी ऑक्टोबर- नोव्हेंबरमधे बिहारमध्ये विधानसभा निवडणूक अपेक्षित आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशात निवडणूक आहे. निवडणुकीसाठी जातनिहाय गणना हा मुद्दा काँग्रेस-राजद-सपा यांनी जोरदारपणे मांडण्याची रणनिती आखली आहेच... पण मोदी सरकारने स्वत:च निर्णय घेऊन विरोधकांची हवाच फुस्स केली. ज्या काही तीन राज्यांत जातनिहाय गणना झालेली आहे, त्याच्या पारदर्शिकतेबाबत केंद्रीयमंत्री अश्विनी वैष्णव यांनी शंका प्रकट केली आहे. संविधानातील अनुच्छेद २४६ नुसार जातनिहाय गणना करण्याचा अधिकार राज्यांना नसून केवळ केंद्र सरकारलाच आहे.

काँग्रेसने सुरुवातीपासून जातनिहाय गणनेचा कधी पुरस्कार केला असे नव्हे. काँग्रेसने स्वातंत्र्यापासून देशावर सहा दशके सत्ता उपभोगली. पण कधी जातनिहाय गणना केली नाही. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारने सन २०१० मधे जातनिहाय गणनेचे आश्वासन दिले होते. मनमोहन सिंग सरकारने सामाजिक-आर्थिक जातनिहाय गणनेच्या नावाखाली निव्वळ सर्वेक्षण केले. पुढे काही घडले नाही. देशात १९३१ मध्ये जातनिहाय जनगणना झाली होती. याच जातनिहाय जनगणनेच्या आधारावर मंडल आयोगाने १९८० मध्ये आपला अहवाल दिला होता व तत्कालीन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी १९९१ मधे शिफारसी लागू केल्या. त्यानंतर मागास व उपेक्षित जातीच्या लोकांची संख्या किती आहे, याचे सर्वेक्षण करावे हा मागणी जोर धरू लागली. आता मात्र मोदी सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. भाजपा आरक्षण विरोधी आहे, भाजपा आरक्षण संपुष्टात आणार आहे या विरोधी प्रचाराला मोदींनी जातनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयातून सडेतोड उत्तर दिले आहे.


जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेऊन मोदी सरकारने विरोधकांची हवाच काढून घेतली. मोदींनी हेडलाइन दिली पण डेडलाईन सांगितली नाही, अशी प्रतिक्रिया काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्याने दिली. बिहारच्या निवडणुकीत जातगणना हा मुद्दा काँग्रेस व राजद जोरदारपणे मांडू शकेल याची कल्पना भाजपाला आहे. पण त्याची धार आता बोथट झाली आहे. कर्नाटक, बिहार व तेलंगणा या तीन राज्यात जातनिहाय सर्वेक्षण झाले, पण सर्वेक्षणाचा तपशीलच बाहेर आलेला नाही. सन २०२१ व २०२३ मध्ये मोदी सरकारने आगामी जनगणनेत जातीचा समावेश करण्याची कोणतीही योजना नाही, असे म्हटले होते. सन २०२१ मध्ये केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयातही हीच भूमिका मांडली होती. केंद्रात युपीए सरकार असताना सन २०११ मध्ये सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण केले होते पण त्याचाही तपशील कधी पुढे आला नाही.

जाती व समाजाचे नेतृत्व करणारे पुढारी आजही आपल्या समाजाची उन्नती करायची असेल, तर सरकारी नोकरीत व शिक्षणात आरक्षण मिळाले पाहिजे यावर ठाम आहेत. महाराष्ट्रात मराठा, गुजरातमध्ये पाटीदार, राजस्थानमध्ये जाट व आंध्र प्रदेशात कापू यांची आंदोलने थंडावलेली दिसत असली तरी त्या समाजात असंतोष कायम आहे. मोदी सरकारने आर्थिक निकषावर आरक्षण दिले तरी कोणत्याही समाजाने आपला आरक्षणाचा हट्ट सोडून दिलेला नाही. काही राज्यांनी ५० टक्के आरक्षाची मर्यादा ओलांडली असली तरी आमच्यात आणखी कोणाला वाटेकरी आणू नका असे ओबीसी नेते सतत सांगत असतात. जातनिहाय जनगणना कधी होणार हे गुलदस्त्यात आले. काँग्रेस, राजद, सपा, बसप, राष्ट्रवादी काँग्रेस असा बहुतेक सर्वच विरोधकांना जातनिहाय जनगणना हवी आहे. तृणमूल काँग्रेसची भूमिका मात्र स्पष्ट झालेली नाही. अगोदर भाजपाने जातनिहाय जनगणनेला जोरदार विरोध केला. जातनिहाय गणना म्हणजे देशाचे विभाजन करण्याचा प्रयत्न असा आरोप भाजपाने काँग्रेसवर केला होता. जातनिहाय गणना हा निर्णय बिहार व उत्तर प्रदेशच्या निवडणुका डोळ्यांपुढे ठेऊन सरकारने घेतला असावा. मात्र हा निर्णय केवळ चुनावी जुमला ठरू नये...

# एकीकडे उष्णतेची लाट; तर दुसरीकडे पाण्याचा हाहाकार!!



बदलते हवामान व उष्णतेची लाट यामुळे धरणातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होतांना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत वाढत्या उष्णतामानामुळे राज्यातील जल साठा आतापासूनच ३८ टक्क्यांवर येवून ठेपला आहे आणि पुढील दोन महिने अजून बाकी आहे त्यामुळे जलसाठ्याची घसरगुंडी अत्यंत चिंताजनक असल्याचे दिसून येते. कारण पुणे, विदर्भ, छत्रपती संभाजीनगर, कोकण, मराठवाडा येथील संपूर्ण मोठ्या धरणांचा जलसाठा झपाट्याने खाली घसरत आहे. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील अनेक भागातील नागरिक सापडल्याचे दिसून येते.त्यामुळे आतापासूनच पाण्याचे गांभीर्य लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळून योग्य वापर करण्याची गरज आहे.कारण राज्यातील जलसाठ्याची आकडेवारी पहाली तर अत्यंत गंभीर परिस्थितीत आहे ती याप्रमाणे नागपूर ३९.२७ टक्के, अमरावती ४८.९६ टक्के, पुणे ३२.७० टक्के, छत्रपती संभाजीनगर ३८.७७टक्के, नाशिक ४२.६४ टक्के कोकण ४८.४१ अशाप्रकारे प्रमुख शहरातील जलसाठ्याची स्थिती आहे आणि दररोज झपाट्याने साठा कमी-कमी होत आहे यावर सरकारने ताबडतोब गांभीर्याने लक्ष केंद्रित करून उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा पुढील दोन महिन्यांत यापेक्षाही गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही.आज राज्यातच नाही भारतासह संपूर्ण जगात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे परिस्थितीनुसार पाण्याचा वापर होणे अत्यंत गरजेचे आहे.आज पाणी टंचाईची समस्या जगातील इतर अनेक ठिकाणांसारखीच थायलंडमध्येही आहे.मात्र त्यामुळे सण साजरा करण्याच्या उत्साहात अडचण येऊ नये म्हणून फॉगी स्प्रे,ईको-फ्रेंडली वॉटर गन्ससारख्या गोष्टींचा वापर केला जातो.म्हणजे सणाच्या निमित्ताने सुध्दा पाण्याची बचत केली जाते ही बाब थायलंड कृतीतून सिद्ध होते.त्यामुळे भारतात उन्हाळ्यातील पाण्याची गंभीर समस्या पहाता पाण्याचा एक-एक थेंब वाचविणे अत्यंत गरजेचे आहे.आज महाराष्ट्रासह भारतातील अनेक ग्रामीण भागात पाण्याची गंभीर समस्या आहे.कारण आजही ग्रामस्थांनांना पाण्यासाठी ३ ते ४ किलो मिटर अंतरापर्यंत वनवन हिंडावे लागते ही संपूर्ण परिस्थिती बदलते हवामान, जगातील युद्धजन्य परिस्थिती, जंगलतोड, वनवे लागने, ग्लोबल वॉर्मिग,समुद्राची पातळी वाढने या संपूर्ण गोष्टींमुळे भुजल साठा दिवसेंदिवस कमी होतांना दिसतो.आजही आपण पहातो की वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा होत आहे म्हणजे पाणी समस्ये गंभीर रूप धारण केले असून पुढे चालून आक्राळविक्राळ रूप धारण करू शकते यालाही नाकारता येत नाही.कारण आजही राज्यासह देशातील अनेक क्षेत्र पाण्याच्या बाबतीत रेड झोनमध्ये असल्याचे सांगितले जाते.कारण संपूर्ण सृष्टी, मनुष्य, संपूर्ण जीवजंतू पाण्याशिवाय जगूच शकत नाही त्यामुळे सरकारने पावसाळ्यात पाणी अडविण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे, पाणी जमीनीच्या पोटात गेले पाहिजे यासाठी युध्दपातळीवर वृक्षलागवड काळाची गरज आहे,औद्योगिकीकरणावर सरकारने लगाम कसली पाहिजे, वाढते शहरीकरण यावरही अंकुश लागायला हवा.कारण निसर्ग सुखरूप रहाला तर सर्वच काही ठीक राहील अन्यथा विनाशकारी प्रक्रिया दिवसेंदिवस वाढतच जाईल म्हणून पाण्याच्या बाबतीत सरकारने सावधगिरीने पाऊल उचलने गरजेचे आहे.वृक्षतोडीची झळ सर्वांनाच भोगावी लागते ही बाब मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने कृतीतून सांगितली.नागपूर शहरात विविध विकास प्रकल्पांसाठी शहरातील अनेक भागांत नागपूर महानगरपालिकेव्दारे वृक्षतोड केली जात आहे.पण बदल्यात वृक्षारोपण मात्र शहराच्या बाहेर केले जात असल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोंदविण्यात आले.शहरातील झाडे तोडली जात असल्यास शहराबाहेर वृक्षारोपण काय कामाचे, अशा शब्दात नागपूर खंडपीठाने महापालिकेला खडसावत क्रीडा संकुलासह इतर ठिकाणी प्रस्तावित वृक्षतोडीवर अंतरिम स्थगितीही दिली आहे. १ हजार ३७४ वृक्ष तोडण्याचा प्रस्ताव असून या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्थगिती दिली आहे.या वृक्षतोडीच्या बदल्यात गोरेवाड्यात वृक्षारोपण करणार असल्याची माहिती न्यायालयाला देण्यात आली.वृक्षतोड शहरात करायची आणि वृक्षारोपण शहराबाहेर करायचे, हे चालणार नाही असे न्यायालयाने मौखिकपणे नमूद केले. यावरून आपण समजू शकतो की वृक्षतोडीमुळे पाण्यासह जीवनाशी निगडित अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात.शहरातील वृक्ष तोडायचे आणि शहराबाहेर वृक्षारोपण करायचे याला काय अर्थ?अशा शब्दातही उच्च न्यायालयाने नागपूर महानगरपालिकेला खडसावले.यावरून लक्षात येते की शहरीकरणाच्या नावाखाली नागपूरसह राज्यातील अनेक भागांत वृक्षांची कत्तल सुरु आहे ही बाब सिद्ध होते आणि आज राज्यात किंवा देशात जी पाण्याची समस्या भेडसावत आहे व पाणी साठा दिवसेंदिवस कमी-कमी होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त वृक्षतोड व जंगलतोड होय.वृक्ष कटाई पाच मिनिटांत होते.परंतु एक वृक्ष लावून मोठे करायला पाच वर्षे लागतात याचे गांभीर्य सरकारने लक्षात ठेवून जलसंपदा टिकवून ठेवण्यासाठी सरकारने सर्वच स्तरातून वृक्षलागवडीवर भर देण्याची गरज आहे. सरकारमार्फत जेवढी झाडे तोडायची असेल त्याच्या दुप्पट वृक्षलागवड सरकारने प्रथम करावी ;नंतर वृक्ष तोडण्याचा निर्णय द्यावा.जय हिंद!



लेखक
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

# जात निहाय जनगणना



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**


गील आठवड्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. या संबंधीची घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत केल्यानंतर संपूर्ण देशातून जात निहाय जनगणनेचे स्वागतच करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून विरोधकांसह अनेक सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह विरोधकांकडून सातत्याने जात निहाय जनगणनेची मागणी होत होती. विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही मागणी सातत्याने लावून धरली होती. उशिरा का होईना पण पण जात निहाय जनगणनेला मंजुरी देऊन सरकारने एक चांगला निर्णय घेलता आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच जात निहाय जनगणना होतेय हे विशेष याआधी इंग्रजांच्या काळात १८८१ ते १९३१ पर्यंत झालेल्या जनगणनेत जातींची गणना झाली होती. १९४१ च्या जनगणनेत देखील जातींची गणना करण्यात आली होती पण त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नव्हती. १९५१ साली स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा जनगणना झाली या जनगणनेत जात निहाय जनगणना व्हावी अशी मागणी झाली होती मात्र तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी त्यास नकार दिला त्यांच्या मते जात निहाय जनगणनेमुळे जातिजातीत विभाजन होऊन राष्ट्रीय एकतेला बाधा पोहचू शकते त्यामुळे त्यांनी जात निहाय जनगणेस नकार दिला होता. मात्र या जनगणनेत अनुसूचित जाती आणि जमातींची गणना करण्यात आली तशी ती प्रत्येक जनगणनेत करण्यात आली कारण अनुसूचित जाती जमातींची जनगणना व्हावी असे घटनेतच नमूद करण्यात आले आहे. अनुसूचित जाती जमातींची गणना जनगणनेत केली जाते मात्र इतर मागासवर्गीय जातींची गणना करण्यात येत नव्हती ती आता करण्यात येईल. जात निहाय जनगणना हा एक चांगला निर्णय आहे. जात निहाय जनगणना झाल्याने सर्व जातींची लोकसंख्या मोजण्यात येईल त्यामुळे कोणत्या जातींची किती लोकसंख्या आहे ते समजेल. १९३१ साली झालेल्या जनगणनेत मागासवर्गीय जातींची लोकसंख्या ५२ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगण्यात आले होते. मंडल आयोगाने इतर मागास वर्गाला आरक्षण देताना हीच लोकसंख्या ग्राह्य धरून इतर मागास वर्गाला २७ टक्के आरक्षण दिले होते. इतर मागास वर्गाची लोकसंख्या यापेक्षा अधिक आहे त्यामुळे २७ टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण मिळायला हवे अशी मागणी इतर मागास वर्गाकडून होऊ लागली होती. आता जात निहाय जनगणना झाल्यामुळे सर्व जातींची लोकसंख्या मोजली जाईल त्यामुळे या वर्गाची नाराजी दूर होईल. जात निहाय जनगणना झाल्याने आरक्षणाची जी ५० टक्के मर्यादा आहे ती देखील वाढवली जाईल. सध्या सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ठेवली आहे. जात निहाय जनगणनेमुळे संसद आणि विधान सभेचे चित्रही बदलू शकते. शिवाय जात निहाय जनगणना झाल्यावर प्रत्येक जातीच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी उपलब्ध करून दिला जाईल. जात निहाय जनगणनेमुळे प्रत्येक जातीची शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता येईल. या आकडेवारीत स्पष्टता आल्यावर सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल एकूणच जात निहाय जनगणना ही देशाच्या सामजिक आणि आर्थिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारी ठरेल. आता प्रश्न असा आहे की ही जात निहाय जनगणना होणार कधी ? जात निहाय जनगणने संदर्भातील विधेयक आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. म्हणजेच सप्टेंबर पासून जात निहाय जनगणनेची प्रारंभिक प्रक्रिया सुरू होऊशकते. मात्र प्रत्यक्ष जात निहाय जनगणना एप्रिल २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. २०२१ सालीच ही जनगणना व्हायला हवी होती मात्र कोरोणामुळे ती पुढे ढकलण्यात आली आता ती पुढील वर्षी होण्याची शक्यता आहे. जनगणना ही दर दहा वर्षांनी होते. जनगणना ही दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्यक्ष जनगणनेचे काम जरी काही महिनेच असले तरी त्यातून येणाऱ्या आकडेवारीचे प्रामाणिकिकरण आणि प्रकाशनासाठी एक दोन वर्ष लागतात म्हणजेच या जात निहाय जनगणनेची आकडेवारी २०२७ सालीच हाती येईल. या जात निहाय जनगणानेसाठी सुमारे १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली जाईल.

# आनंदी जीवनाची गुरुकिल्ली

व्यक्ती तितक्या प्रकृती आणि प्रवृत्ती सुद्धा ! माणसांचे स्वभाव वेगळे, आवडीनिवडी वेगळ्या, त्यामुळे आज आपण बघतो की प्रत्येक घरात काही ना काही कुरबुरी, भांडण असतात. प्रत्येकच व्यक्ती मीच बरोबर आणि समोरचा चूक असं गृहीतक मांडत असतो. समाजात, राजकारणात सगळीकडे विचारांच्या देवाण-घेवाणी पेक्षा वाद-विवाद आणि भांडणच जास्त दिसतात. या सगळ्यात आपण खळखळून हसणं विसरूनच गेलो आहे. त्यामुळे स्वास्थ्य हरवून बसलो आहे. असं का होतंय. ? सगळ्यांची सहनशक्ती संपली का ? की आपल्यातला अहंकार आणि आपल्या स्वभावातले दोष याला कारणीभूत आहेत ? होय नक्कीच ! वरील सर्व समस्यांच मूळ हेच आहे. अहंमुळे कोणीच माघार घ्यायला तयार होत नाही. तर स्वभावदोषांमुळे मनुष्य सदसदविवेक हरवून बसतो. आपण स्वतः स्वतःचे आत्मपरीक्षण केले तर लक्षात येईल की, राग, लोभ, द्वेष, इर्षा, स्पर्धा यांनी आपण अगदी काठोकाठ भरलो आहोत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत आपल्याला किती राग येतो आणि त्याची कोणती कारण आहेत. हे लिहून काढले तर सहजच त्याची तीव्रता लक्षात येईल. आज प्रत्येक व्यक्ती घरातल्या भांडणामुळे वैतागला आहे. त्यातून आत्महत्या, निराशा, आजारपण यांनी आपल्याला कवटाळले आहे. नवीन पिढीत तर घटस्फोटांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. त्यामुळे मुलांवर संस्कार नाही. आई-वडिलांचे प्रेम नाही .त्यांचा वेळ मिळत नाही आणि आपसूकच त्यांच्यात सगळ्या दोषांचा शिरकाव होतो. यासाठी आपणच आपले दोष ओळखू या. अहं कमी करूया आणि आनंदाने जगूया ! म्हणजे भारताचे आनंदाच्या यादीतले स्थान नक्कीच वर जाईल. घर आनंदी, तर समाज आनंदी. आणि त्यामुळे देश आनंदी.

**सौ. माधवी पत्की**
**नागपूर**

# खरी प्रार्थना



**संत राजिन्दर सिंह जी महाराज**

प्रार्थना परमात्म्याशी संवाद साधण्याची सर्वात प्रभावशाली पद्धत आहे. आपण सर्वजण प्रार्थना करतो. कोणी सकाळी उठून प्रार्थना करतो, कोणी रात्री झोपण्यापूर्वी प्रार्थना करतो. जेव्हा कधी आपण प्रार्थना करतो तर त्यामध्ये आपण काहीना काही तरी या जगतातील वस्तु परमात्म्याकडे मागत असतो.

बऱ्याचदा आपण अशा प्रकारच्या प्रार्थना करत असतो की, हे प्रभू मला ही शारीरिक पीडा होत आहे ही दूर व्हावी. हे प्रभू, माझ्या आईला पीडा होत आहे, त्यांची पीडा दूर व्हावी. हे प्रभू, माझा व्यापार डबघाईला आला आहे, त्याच्यात सुधारणा व्हावी. आपण प्रार्थना करतो की नवीन घर किंवा नवीन मोटार गाडी मिळावी आणि भौतिक वस्तू मिळाव्यात, तसेच आपले शारीरिक आरोग्य चांगले राहावे.

आपण प्रार्थना त्या वस्तूंची करतो कि ज्या आपल्या जीवनात खूप गरजेच्या आहेत. आपणास असे वाटते की आपण जे मागत आहोत ते आपल्याला संपूर्ण जीवनभर मदत करेल परंतु असेही असू शकते की ते आपल्या आयुष्यभरासाठी योग्य नसेल.

प्रार्थना करण्याची योग्य पद्धत ही आहे की, प्रभूची जी इच्छा असेल तेच आपल्या जीवनात व्हावे. प्रभू आपल्याबरोबर काय झाले हे जाणून आहेत, काय होत आहे हेही जाणून आहेत आणि काय होईल हे सुद्धा जाणतात.

प्रभू हे जाणून आहेत की आपल्या करिता काय योग्य आहे. आपल्याला ठाऊक नाही की आपल्या करिता काय चांगले आहे. आपण पण आपली मर्यादित बुद्धी आणि दृष्टिकोनानुसार जे आपल्या करिता चांगले वाटते तेच मागतो. परंतु जर आपण सर्व काही परमात्म्याच्या इच्छेवर सोपवावे कि, परमात्म्याने आम्हाला तेच द्यावे जे आपल्या करिता योग्य आहे, तर अशीच प्रार्थना खरी ठरेल.

# 'सडक्या' राजकारणाचे 'वास्तववादी' दर्शन!

मंगळवार दि. २२ एप्रिल हा दिवस जगासाठी नेहमीप्रमाणेच उगवला असेल. परंतु, महाराष्ट्रातील आणि देशातील काही निष्पापांसाठी मात्र तो 'काळा' दिवस ठरला. जम्मू काश्मीर येथे पर्यटणासाठी गेलेल्या काही पर्यटकांवर पहलगाममधील 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खो-यात काही दहशतवाद्यांनी अचानक हल्ला केला. धर्म, कुराण, कलमा येतात का? असे प्रश्न विचारत हिंदू पर्यटकांना त्यांच्या कुटुंबासमोर गोळ्या घातल्या. राक्षसांच्या या हैवानी कृत्याने संपूर्ण परिसर अक्षरशः हादरून गेला. अचानक झालेल्या या हल्ल्यात २८ निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. तर, २० पर्यटक गंभीर जखमी झाले. हे वृत्त प्रसारित होताच, संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. प्रत्येक हिंदूचे रक्त पेटून उठले. पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचा दौरा अर्धवट सोडून मायदेशी परतले. गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तातडीने काश्मीरला रवाना झाले.

या दहशतवादी हल्ल्याला पाकिस्तान जबाबदार असल्याचे समोर येताच, संपूर्ण देशासह इतर अनेक देशांनीही निषेध नोंदवला. पण, 'तळपायाची आग मस्तकात' जाणारी गोष्ट म्हणजे, आपल्याच काही 'करंट्या' वाचाळविरांनी या अतिअसंवेदनशील गोष्टीचेही नेहमीप्रमाणेच राजकारण करून, आपण कसे 'गेंड्याच्या कातडी'चे आणि 'पाषाणहृदयी' धेंड आहोत, हे सर्व जगाला दाखवून दिले.

यात सर्वात आघाडीवर अर्थातच स्वतःला अतिविद्वान(?) समजणारे विश्वप्रवक्ते होते. या महाशयांनी नेहमीप्रमाणेच या हल्ल्याला मोदी आणि शहांना जबाबदार धरले. वरतून मोदींनी दौरा अर्धवट सोडला आणि अमित शहा, एकनाथ शिंदे तातडीने गेले म्हणजे, त्यांनी काही उपकार नाही केले, असे अतिशय विकृत विधानही केले. इतकेच नव्हे तर, फक्त हिंदूच नव्हे तर, मुस्लिमही मारले गेले, असा 'जावईशोध' लावत, एकप्रकारे पीडितांच्या 'जखमेवर मीठ'च चोळले. वस्तुस्थिती अशी आहे की, सय्यद अदिल हुसेन शाह या २० वर्षीय मुस्लिम तरुणाने 'ते आपले पाहुणे आहेत, त्यांना मारू नका', अशी विनंती केली. पण, दहशतवादी ऐकायला तयार नव्हते, म्हणून त्याने बंदूक हिसकवण्याचा प्रयत्न केला असता, दहशतवाद्यांनी त्यालाही गोळ्या घातल्या. विश्वप्रवक्त्यांनी नेहमीप्रमाणे मुक्ताफळे उधळली. पण, घटनेच्या २/३ दिवस आधी 'महाराष्ट्राच्या' आणि 'मराठी' माणसाच्या हिताच्या 'पोकळ' गप्पा झोडणारे आपले नेते लंडनला 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' पार पाडण्यात 'मस्त' होते, याचा यांना 'सोईस्कर' विसर पडला. मराठी माणसांचा मेंदू बाहेर पडला. पण, दौरा तर सोडा पण, साधं एक ट्वीटही करण्याचे त्यांच्या मेंदूत आले नाही; आणि यावर भाष्य करण्याचे यांच्या मेंदूत आले नाही.

काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी तर 'निर्लज्जपणाचा कळस'च गाठला. दहशतवाद्यांनी पर्यटकांना धर्म विचारून गोळ्या घातल्याचे त्यांचे नातेवाईक जीवाच्या आंकातने सांगत होते; आणि आजही सांगत आहेत. पण, वडेट्टीवार यांनी डोळ्याला पट्टी आणि कानात बोळे घातलेले असावेत. म्हणूनच ते म्हणाले की, दहशतवाद्यांना कोणाचा धर्म विचारण्याइतका वेळ असतो का? त्यांनी कानाजवळ जाऊन धर्म विचारला का? असे आपल्या 'अकलेचे तारे' तोडत, असहाय्य पीडितांचा घोर अपमान केला आहे. सर्व स्तरातून त्यांचे तोंड काळे व्हायला सुरुवात होताच, 'माझ्या विधानाचा विपर्यास करण्यात आला. माझे वक्तव्य तोडून-मोडून दाखवले गेले' हा नेहमीचाच ठेवणीतला डायलॉग मारून प्रसारमाध्यमांच्या डोक्यावर खापर फोडले. कर्नाटकचे काँग्रेसचे मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांनीही इतकी संतापजनक घटना घडूनही 'पाकिस्तानविरुध्द युध्द करण्याची गरज नाही' असे मुर्खपणाचे विधान करून एकप्रकारे गंभीर घटनेचे समर्थन केले आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. तर, याच सरकारमधील मंत्री आर. बी. तिम्मापूर यांनी 'गोळ्या घालताना दहशतवाद्यांनी धर्म विचारला नव्हता', असा दावा केला आहे. याचप्रमाणे सोनिया गांधी यांचे जावई रॉबर्ट वद्रा आणि माजी मंत्री मनिशंकर अय्यर यांनीही वादग्रस्त विधाने करून आपण मुस्लीमधार्जीणे असल्याचे दाखवून दिले आहे.

स्वतःला 'जाणते राजे' म्हणवून घेणारे; आणि आयुष्यभर जातीयवादाचे राजकारण करणारे 'बारामती'चे 'करामती' काका या शर्यतीत मागे कसे राहतील? यांनी 'हिंदू आहेत म्हणून दहशतवाद्यांनी पर्यटकांना गोळ्या घातल्या, असे म्हणतात. पण यात काय सत्य आहे? याची मला माहिती नाही. पण, तेथे जे लोक होते, त्यातील स्त्रियांना सोडले आहे'. असे अफलातून वक्तव्य करून, पीडितांना खोटे तर ठरवलेच आहे. पण, त्यांच्या भावनांशीही खेळण्याचा लाजिरवाणा आणि घृणास्पद प्रयत्न केला आहे. काँग्रेसने त्यांच्या अधिकृत ट्वीटर हँडलवर डोके, हात-पाय नसणा-या एका व्यक्तीचा फोटो प्रकाशित केला. वरती 'गायब' असे तर खाली 'जिम्मेदारीसे गायब' असे कॅप्शन दिले. अर्थात, ही मोदींवर केलेली टीका आहे, हे न समजण्याइतकी जनता नक्कीच दूधखुळी नाही. पण, प्रश्न असा पडतो की, इतक्या टोकाच्या प्रतिक्रिया देणे; आणि हिंदू-मुस्लिम अशी दरी निर्माण करण्याची खरेच गरज आहे का? या सर्व वाचाळविरांच्या 'मर्कटलिलां'नी सर्वत्र संताप व्यक्त होऊ लागल्यानंतर यांना उपरती झाली. मग लाजेखातर 'आधी पाय मारायचा मग माफी मागायची' यानुसार 'आम्ही सरकारच्या पाठीशी आहोत' असे गोडवे गाऊ लागले. 'उबाठा' गटाचे खासदार तर सर्वपक्षीय बैठकीलाही हजर राहिले नाहीत. 'दुर्गम भागात असल्याने बैठकीला हजर राहू शकत नाही' असे पत्र पाठवून दिले. देशात तणाव असताना, हे 'महारथी' कोणता 'भीमपराक्रम' करायला गेले होते, हा एक संशोधनाचा विषय ठरू शकतो.

विरोधकांनी किमान अशा दुर्दैवी आणि संतापजनक बाबीचे भान ठेवायला हवे होते. विरोधक म्हणजे प्रत्येक गोष्टीला विरोधच केला पाहिजे, असा काही अलिखित नियम नाही. हे पहिल्यांदाच घडत नाही. ४ महिन्यांपूर्वी राज्याला हादरवून सोडणारी; आणि 'माणुसकीला काळीमा' फासणारी मस्साजोगची घटना घडली. तेव्हाही अनेकांनी आपली राजकीय पोळी भाजून घेतली. 'आक्रोश मोर्चा'च्या नावाखाली 'राजकीय इव्हेंट' करताना 'जनाची नाही तर मनाचीही' थोडी वाटली नाही. ईर्शाळवाडी, पोर्शे प्रकरण, समृद्धी अपघात, होर्डिंग्स दुर्घटना किमान अशा असंवेदनशील घटनांचा तरी गांभिर्याने विचार करा. वर्षाचे १२ महिने आणि दिवसाचे २४ तास तुम्ही राजकारणच करत असतात. किमान अशा दुर्दैवी घटनांत तरी एकत्र येऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी भोळ्याभाबड्या जनतेची आशा असते. पण, त्यावरही पाणी फेरण्याचे राजकारण यांनी केले. सत्ताधारीही श्रेयासाठी एकमेकांवर कुरघोडी करत असल्याचे दिसत आहे. थोडक्यात, ही सर्व परिस्थिती बघता, हा प्रकार म्हणजे, आजच्या 'सडलेल्या' राजकारणाचे 'वास्तववादी' दर्शन घडले, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक.
मोबाईल ८७६७५९२९८०










Samsung.com







# शब्दकोडे क्रमांक २१०२



**आडवे शब्द :-**

१) केंद्रीय मंत्रीमंडळातील प्रमुख पद
६) डास, चिलट
१०) मगज
११) लाकूड कापण्याचे हत्यार
१३) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१६) घोड्याचे घर
१८) भावना, विचार यांचे इंद्रिय
१९) च्या सह
२०) किंमत
२१) लवकर, त्वरेने (हिं)
२२) वालुकामय जमीन
२४) मोठी नदी
२६) वाळा
२७) सामन्यात पराक्रम गाजविणारा
२८) सडसडीत
२९) अत्यंत गरजेच्या, अडचणीच्या वेळेला
३२) एक रंगीत कंदमूळ
३४) कशा प्रकारचा
३६) पर्वणी, पुण्यकाळ
३७) चणचण, उणीव
३९) इमारती च्या पायात भरण्याचा दगड
४०) समशीतोष्ण
४२) कार्य
४३) जिवलग मित्र
४५) मनाला लागलेली टोचणी
४६) खटला
४७) हवेचे आवरण
४९) लांबलचक, कंटाळा आणणारे भाषण
५०) चंद्र
५२) अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था
५३) भित्रा
५४) वृद्धी
५५) शिक्षा, दंड करण्याजोगे
५७) अजगर
५८) याग, यज्ञ
५९) स्वत:ची फुशारकी
६०) न घाबरणारा
६१) मळलेला
६४) द्रव्य
६५) चेहेऱ्यावरील तेज
६७) मनसोक्त
७०) नंतर
७१) रमावर
७२) कान
७३) दात
७४) ज्वारी/बाजरी / नाचणीचा एक पदार्थ

**उभे शब्द :-**

१) जेवणाऱ्यांची बसलेली रांग
२) निष्णात
३) जरब, भीती
४) मऊ
५) हिंदीत पत्र
६) मळलेला
७) बशीचा जोडीदार
८) घोडा
९) अग्नी
१२) अरण्यवास
१४) टरफल
१५) श्रीकृष्णाचे एक नाव
१७) संगोपन पालनपोषण
१९) सोबती
२३) कमळाचे तळे
२४) नूतन
२५) गाईचे पिल्लू
२६) छोटा खड्डा
२७) लुगडे, पातळ
२९) नि:सत्व, वाईट
३०) व्यापारी फायदा
३१) एकाद्या विषयावर लोकांचे मत घेणे
३३) वजनदार
३५) चाणक्यनीती
३६) पंख
३७) आत पाणी असलेले माडाचे फळ
३८) दिवस
४०) ** दमयंती
४१) रानरेडा
४२) लबाडीचा हेतू
४४) खाणीत काम करणारा
४५) षष्टीची देवता
४८) व्रत
५१) मालक
५६) यमपुरी नरक
५७) विधनसभेतील लोकप्रतिनिधी
६२) कालू, शिंपला
६३) श्वेत कमळ
६४) हिंमत, धैर्य
६६) हिमालयातील एक केसाळ प्राणी
६८) पुरुष
६९) अरण्य

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# खेळाडू पॅनेलचे सर्व अकराही उमेदवार मताधिक्याने विजयी

## नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना त्रैवार्षिक निवडणूक : धनपाल शहा सातव्यांदा चेअरमन



**नाशिक ।** नाशिक जिल्हा क्रिकेट संघटना त्रैवार्षिक निवडणुकीत खेळाडू पॅनेलचे सर्व अकराही उमेदवार मतधिक्याने विजयी झाले आहेत. धनपाल शहा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत विजयी झाले असून, त्यांनी सलग सातव्या वेळेस अध्यक्ष होण्याचा बहुमान प्राप्त केला आहे.

दिनांक ३ मे रोजी रोजी अन्नपूर्णा सभागृह , नंदनवन लॉन्स, मते नर्सरी रोड, गंगापूर रोड, नाशिक येथे झालेल्या नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या चेअरमन व कार्यकारिणी सदस्यांच्या १० पदांसाठी झालेल्या त्रैवार्षिक (सन २०२५ ते २०२७) निवडणुकीत, विद्यमान चेअरमन धनपाल (विनोद) शहा यांच्या नेतृत्वाखालील खेळाडू पॅनेलचे सर्व अकराही उमेदवार, मोठ्या मतधिक्याने विजयी झाले. ३११२ सभासद व ७६ क्लब मधून एकूण १३७७ मतदारांनी मतदान केले. खेळाडू पॅनलचे नवनिर्वाचित चेअरमन व कार्यकारिणी सदस्य व त्यांना मिळालेली एकूण मते पुढीलप्रमाणे- १) चेअरमन धनपाल (विनोद) मोतीलाल शहा- १२४३, दहा कार्यकारिणी सदस्य : १) महेन्द्र (राजू) कारभारी आहेर- १२२२. २) राघवेंद्र जयंतकुमार जोशी-१२११. ३) हेतल खेमचंदभाई पटेल- ११६९. ४) जगन्नाथ चंदु पिंपळे- ११०३. ५) शिवाजी भीमाजी उगले- १०६४. ६) अनिरुद्ध विनायक भांडारकर- १२३३. ७) निखिल रामनारायण टिपरी- ११९७. ८) विक्रांत प्रकाश मते- १२५५. ९) बाळासाहेब उमाजी मंडलिक- १२०५. १०) नितीन सदाशिव धात्रक- १२२४ वैयक्तिक पराभूत उमेदवार व त्यांची मते : चेअरमन- महेश झुंजार आव्हाड- ६८. कार्यकारिणी सदस्य- २) संदीप श्रीकिसन सेनभक्त- ५६२. ३) महेश देवबा भामरे-१९८. ४) ज्ञानेन्द्र सिंग सिसोदिया- १५२ पुढील एकूण सात पदाधिकारी आधीच बिनविरोध निवडून आले होते- सेक्रेटरी : १) समीर रकटे, खजिनदार : १) हेमंत देशपांडे व जॉइंट सेक्रेटरी : योगेश ( मुन्ना ) हिरे व २) चंद्रशेखर दंदणे आणि निवड समिति सदस्य १) सतीश गायकवाड २) तरुण गुप्ता व ३) फैय्याज गंजीफ्रॉकवाला.

निवडणूक अधिकारी ॲड. मनीष लोणारी आणि असोसिएट्स यांनी काम बघितले व मतमोजणी नंतर आकडेवारी जाहीर केली. उद्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये निवड जाहीर करण्यात येणार आहे. या निर्विवाद यशामुळे अध्यक्ष श्री धनपाल (विनोद) शाह यांच्या नेतृत्वाखालील विजयी खेळाडू पॅनेलचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## ➤ महत्त्वाचे

### नाईट हायस्कूलमध्ये नाशिप्र मंडळाचा वर्धापन दिन

**नाशिक ।** कोणतीही वस्तू विकतघेताना आधी रेटिंग व स्टार तपासतो, त्याचप्रमाणे आज आपण ज्या संस्थेत शिक्षण घेत आहोत, ती १०७ वर्षे जुनी संस्था व ७३ वर्षे जुनी शाळा आहे. पाच संस्थापकांनी लावलेल्या या विद्यादानाला विद्यार्थ्यांनी सेवादानाची जोड द्यावी. आपल्याप्रमाणेच इतरांच्याही आयुष्यात घडवावे, असे प्रतिपादन संस्थेचे शालेय समिती अध्यक्ष अनिल नाईक यांनी केले. येथील नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या १०७ व्या वर्धापन दिनानिमित्त अशोक स्तंभ येथील नाइट हायस्कूलमध्ये आयोजित कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षस्थावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डी. यू. अहिरे, माजी अध्यक्ष शिवाजी कुमावत, मुख्याध्यापक गुळवे, माजी विद्यार्थी रवींद्र आखाडे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या संस्थापकांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. माजी अध्यक्ष शिवाजी कुमावत यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने नवीन पाच विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी तयार करावे, अशी सूचना आपल्या भाषणात केली. संस्थेच्या संस्थापकांच्या कार्याची ओळख कार्याध्यक्ष डी.यू.अहिरे यांनी करून दिली. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाची माहिती मुख्याध्यापक गुळवे यांनी दिली. शशिकांत खोत यांनी सूत्रसंचालन केले तर कांतिलाल कासार यांनी आभार मानले. याप्रसंगी शिक्षिका शेळके व आजी, माजी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### के. टी. राजोळे यांना इगतपुरी रत्न पुरस्कार

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यातील वाडीवऱ्हे येथील जेष्ठ पत्रकार के. टी. राजोळे यांना प्रहार सैनिक कल्याण संघाच्या इगतपुरीरत्न पुरस्काराने राष्ट्रीय अध्यक्ष विनोदसिंग परदेशी, जिल्हाध्यक्ष विजय कातोरे यांनी सपत्नीक




सन्मानपूर्वक गौरव केला. राजोळे हे गेल्या ३३ वर्षांपासून पत्रकारिता करीत असून वंचीत, आदिवासी बांधवांना लेखणीच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला आहे. त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कार मिळाले असून त्यांच्या कार्याची प्रहार सैनिक कल्याण संघाने दखल घेऊन माजी सैनिकांच्या हातून सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कॅप्टन ए.पी राठोड, माजी सैनिक दिनकर घोटेकर सुबेदार दादाभाऊ महाजन (कारगिल योद्धा), माजी सौनिक नवनाथ पवार, प्रभास नारायण उपाध्याय, डॉ.डी.डी. धोंगडे, सुनिल जाधव, मंगेश निगळ, गोरख पालवे, कॅप्टन मोहिते साहेब, प्रकाश शिंदे, माजी सैनिक अतुल कुलकर्णी, दीपक घुमरे माजी सैनिक हरिष चौबे आदी उपस्थित होते.

### इंग्लिश मिडीयमच्या स्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**नाशिक ।** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये झालेल्या इयत्ता पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत सटाणा आदर्श इंग्लिश मिडीयम स्कूलने याहीवर्षी यशाची परंपरा कायम ठेवली. शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता ५ वीतील स्वामिनी गौरव खैरनार (168/56.34%) व आराध्या हेमंत भामरे (138/46.30%) या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. तर इयत्ता ८ वीतील रिचा धनंजय जाधव (152/51.35%), सारंगी मनोहर भदाणे (150/50.67%), पुष्कर पंडित ठोके (146/49.32%), जान्हवी भानुदास काकूळते (136/45.94%) समर्थ सतीश रौंदळ (128/43.24 %) या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक व मार्गदर्शक शिक्षक. विनय सोनवणे व सारिका कदम यांचे मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, बागलाण तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, महिला संचालक शालनताई सोनवणे तसेच शालेय समितीचे अध्यक्ष सुनील सोनवणे व शालेय समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापिका वैशाली सोनवणे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले. पंचायत समिती बागलाणच्या ग. शि. मा. चित्रा देवरे, विस्तार अधिकारी हिरालाल बधान, केंद्रप्रमुख विजय पगारे यांनी विदयार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

### माधव ढाकणे यांचे निधन

**दिंडोरी ।** ओझे येथील प्रगतशील शेतकरी



व दिंडोरी तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष विलास ढाकणे याचे वडील माधव विठ्ठल ढाकणे (९०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, पुतणे, तीन मुले, मुलगी, सुना, नातवडे असा परिवार असून ते अतिशय धार्मिक महानुभव पंथ असा त्यांचा परिचय होता.

## प्लास्टिक कचरा संकलन स्पर्धेत उत्तमनगर अभिनव बालविकास मंदिर तृतीय

**नाशिक ।** महापालिकेच्यावतीने आयोजित स्वच्छ भारत अभियान 2.0 अंतर्गत कचरा संकलन स्पर्धेत मविप्र संचलित सिडकोतील अभिनव बालविकास मंदिर या शाळेने तिसरा क्रमांक पटकावला.



शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी व पालक यांच्यात प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. तसेच, शाळेच्या विद्यार्थ्यांना प्लास्टिक कचरा संकलन तसेच प्लास्टिक जमा करण्यास सांगण्यात आले होते. प्लास्टिकपासून होणाऱ्या दुष्परिणामांचीही माहिती देण्यात आली होती. कुठलेही प्लास्टिक न वापरण्याचे आवाहनदेखील करण्यात आले होते. या सर्वांचा परिपाक म्हणून शाळेला या स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. शाळेचा तृतीय क्रमांक आला असला तरी प्लास्टिकबंदी आणि प्लास्टिक कचरा संकलन हे उपक्रम यापुढेही कायम सुरु ठेवले जातील, नाशिक शहर प्लास्टिकमुक्तीसाठी नेहमी सहकार्य असेल, अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापिका ज्योती पवार यांनी व्यक्त केली. अभिनव बालविकास मंदिर शाळेला मिळालेल्या पारितोषिकाबद्दल मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व सर्व पदाधिकारी-संचालक, शिक्षणाधिकारी यांनी शाळेचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे स्वागतकेले आहे.

## पुण्याच्या समाजसेविका अश्विनी पाचारणे यांना 'महासागर एक्सलन्स पुरस्कार २०२५' जाहीर

**पुणे ।** समाजसेवा, सहकार व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत येथील अश्विनी राजेंद्र पाचारणे यांची 'महासागर एक्सलन्स पुरस्कार २०२५' या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सिने अभिनेत्री दिपाली सय्यद यांच्या उपस्थितीत त्यांचा पनवेल येथे गौरव करण्यात येणार आहे. या गौरवाबद्दल प्रतिक्रिया देताना त्यांनी प्रेस क्लबचे आणि आयोजकांचे मनःपूर्वक आभार मानले असून, "हा सन्मान मला अधिक निष्ठेने समाजासाठी काम करण्याची प्रेरणा देतो," असे त्या म्हणाल्या. अश्विनीताईंचा प्रवास खेड तालुक्यातील साकुर्डी गावापासून सुरू होतो. समाजकार्याचा वारसा लाभलेल्या आणि पती राजेंद्र पाचारणे यांची साथ लाभलेल्या अश्विनीताईंनी सामाजिक, व्यावसायिक व सहकारी क्षेत्रात अनेक उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'अरिकेत आलोय इंडस्ट्रीज ओम साई इंडस्ट्रीज', 'लिलावती जनरिक मेडिकल', 'अरिकेत एलएमके फार्मा प्रोड्युसर कंपनी' यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी शेकडो लोकांना रोजगार व आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली. कोविड काळात गरजूंना रेमडेसिव्हर इंजेक्शन, बेड, धान्य, किट्स तसेच वैद्यकीय सहाय्य पुरवण्याचे काम अत्यंत समर्पणाने त्यांनी पार पाडले.



मतदार संघातील आरोग्य शिबिरे, २४ तास रुग्णसेवा, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे, शैक्षणिक सहाय्य व महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांमुळे त्यांचे कार्य व्यापक आहे. त्यांच्या सहकार क्षेत्रातील नेतृत्वाची दखल घेऊन राजगुरुनगर सहकारी बँक संचालिका म्हणून २०२२ मध्ये त्यांची निवड झाली.

सांस्कृतिक क्षेत्रातही सक्रिय राहून, त्या शरद कला क्रीडा सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या पुणे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. अश्विनीताईंच्या अष्टपैलू कार्यामुळे त्यांना मतदार संघाचा, समाजाचा आणि आता राष्ट्रीय स्तरावरील सन्मानाचा मान मिळत आहे.

## वाहन चालक शिंदे यांचा आयुक्तांचे हस्ते सन्मान

**नाशिक ।** कामगार दिनानिमित्त मनपा आयुक्त मनिषा खत्री यांच्या हस्ते पर्यावरण संवर्धन संदेश देणारे मनपा वाहनचालक विलास शिंदे यांचा सन्मान करण्यात आला.



नाशिक महानगरपालिकेच्या वतीने ६६ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त मनपा आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांच्या हस्ते धवजरोहन सोहळा सम्पन्न झाला. यावेळी कामगार दिनानिमित्त वाहनचालक संघटनेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या वाहन चालक विलास शिंदे यांचा आयुक्त मनिषा खत्री यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, प्रदीप चौधरी, उपायुक्त लक्ष्मीकांत सताळकर, नितीन पवार, नितीन नेर, शहर अभियंता संजय अग्रवाल, रवींद्र धारणाकर, मुख्य लेखाधिकारी दत्तात्रय पाथरुट,मुख्यलेखा परीक्षक बळवंत गायकवाड, स्मार्ट सिटी मुख्य कार्यकारी अधिकारी सुमंत मोरे, वैद्यकीय अधिकारी डॉ.तानाजी चव्हाण, कार्यकारी अभियंता सचिन जाधव, नितीन पाटील, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद आदी अधिकारी, कर्मचारी यांनी विलास शिंदे यांचे अभिनंदन केले. या सोहळ्यास वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष सुनील कपिले, उपाध्यक्ष अनिल शिंदे, बंडू मगर, संजय तांबडे, योगेश कदम, अनिल गायकवाड, विजय सावंत, अंजीराम काळे, सोमनाथ धात्रक, अशोक रोंगटे आदी वाहनचालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले.

## महाराष्ट्रदिनी बौद्ध विहारात विशेष कार्यक्रम



**नाशिकरोड ।** महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या निमित्ताने नाशिक रोड येथील बौद्ध विहारात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात "दै. महासागरचे" प्रतिनिधी पत्रकार भैयासाहेब कटारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थितांनी त्रिशरण पंचशील ग्रहण केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना कटारे यांनी कामगारदिनाचे ऐतिहासिक महत्त्व सांगत, डॉ. आंबेडकरांनी कामगार हितासाठी केलेल्या क्रांतिकारी कार्यांचा उल्लेख केला. "पूर्वी कामगारांना १२ तास काम करावे लागत होते; परंतु डॉ. आंबेडकरांनी ते ८ तासांवर आणले. महिलांना प्रसूती रजा, पेन्शन, ग्रॅज्युएटी, प्रोव्हिडेंट फंड या सारख्या सुविधा त्यांनीच उपलब्ध करून दिल्या," असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, "उच्चशिक्षण ही आजच्या काळाची गरज आहे. शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे, आणि जो कोणी ते प्राशन करतो, तो अन्यायाविरुद्ध लढण्यास समर्थ होतो." शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी पालकांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमात नाशिक रोड पोस्ट ऑफिसचे कर्मचारी आणि नाशिक सायकलिस्ट क्लबचे सदस्य रत्नाकर शेजवळ यांचा विशेष गौरव करण्यात आला. त्यांनी पोस्ट सेवा पूर्ण २० वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्ताने स्वखर्चातून गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे (पेन, पेन्सिल, वह्या, कंपास इत्यादी) वाटप केले. आभार प्रदर्शनही शेजवळ यांनीच केले.

## बिटको गर्ल्स हायस्कूलमध्ये महाराष्ट्र दिन



**नाशिक ।** येथील श्रीमती र. ज. चौहाण बिटको गर्ल्स हायस्कूलमध्ये ६६ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी माजी वायुदल सैनिक कृष्णाजी थोरात, हायस्कूलच्या माजी पर्यवेक्षिका मंगला पाठक, ज्येष्ठ पत्रकार किरण लोखंडे, कैलास बडगुजर आदी कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. व्यासपीठावर या मान्यवरांसह शाळेच्या मुख्याध्यापिका प्रज्ञा महाले, उपमुख्याध्यापिका जागृती टिळे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष व अभिनेते योगेश्वर थोरात, टीएम बोर्ड सदस्य कैलास आरोटे उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रारंभी ध्वज वंदन करण्यात आले. तसेच माता सरस्वती व याच दिवशी संस्थेचा वर्धापनदिन असल्यामुळे संस्थेच्या संस्थापकांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका महाले यांनी प्रास्ताविकात महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन यांचे महत्व समजावून सांगितल. शिक्षक प्रतिनिधी अभिजित दळवी यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. दैनिक पुण्यनगरीने शाळेविषयी माहिती देणारी 'माझी शाळा' ही पुरवणी याच दिवशी प्रसिद्ध केली होती. या पुरवणीचे तसेच 'ज्ञान यात्री' या नियतकालिकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कैलास आरोटे यांनी संस्थेची माहिती सांगितली. कृष्णाजी थोरात यांनी आपल्या भाषणात भारतीय संस्कृतीचे महत्व स्पष्ट केले. मंगला पाठक यांनी मनोगतात भारतात व महाराष्ट्रात जन्म मिळणं हे भाग्याचे लक्षण आहे, असं सांगितले. यावेळी विविध स्पर्धा व परीक्षामध्ये यश मिळवणाऱ्या विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अनिता चौधरी व अभिजित दळवी यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शनाने सांगता झाली.

## सरगम थिएटर्सतर्फे रंगली अल्टीमेट बॉलिवूड ड्यूएट्स

**नाशिक ।** जुन्या, नव्या हिंदी चित्रपटसृष्टीतील युगुल गीतांवर रसिकांनी काल ताल धरला. उत्तरोत्तर रंगलेल्या २५ गाण्यांनी उपस्थित श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. विशेषतः शास्त्रीय रागांवर आधारीत गाण्यांना वाद्यवृंदाची सुरेल साथसंगत मिळाली. त्याने गायक कलाकारांचा व रसिकांच्या आनंदात भर पडली.

येथील सरगम म्युझिक ॲकॅडमीच्या रौप्यमहोत्सवी वर्षानंतर सरगम थिएटर्सतर्फे काल 'अल्टीमेट बॉलिवूड ड्यूएट्स' अर्थात हिंदी चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय युगुलगीतांची मैफल आयोजित करण्यात आली. रविवारी ( दि.२७ ) सायंकाळी ६ वाजता प.सा. नाट्यगृहात ही विनामूल्य मैफल झाली. गायक, संगीत संयोजक नंदकुमार देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली





सहभागी गायक, वादकांनी गाण्यांची सुरेल सफर घडवली. तू जो मेरे सूर मे... या गाण्याने मैफलीचा प्रारंभ झाला. वो जब याद आये..., तेरे बिना जिंदगी से..., अजहून आये बालमा...,कितना प्यारा वादा..., तू मिले दिलं खिले...,मै ना भुलुंगा..., कहो ना प्यार है... या व इतर गाण्यांना टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला.

सुरुवातीला वृंदा लवाटे, उमेश गायकवाड, कमलाकर जोशी, प्रशांत जुन्नरे, रविंद्र जोशी आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. संचालक नंदकुमार देशपांडे यांनी स्वागत केले. घन:श्याम जाधव, सुरेंद्र जालिहालकर, अजय पाटील, संतोष कराळे, अमित गुरव तसेच गायिका अपर्णा माडीवाले, दीपाली पाटे, प्राजक्ता गायधनी, भाग्यश्री गायधनी, मयूरी मुर्डेश्वर यांनी लोकप्रिय युगुलगीते सादर केली. त्यांना वाद्यसंगीताची साथसंगत प्रशांत महाले, अनोष आढाव, अभिजित शर्मा, फारुख पिरजादे, गौरव तांबे, बाबा सोनवणे या कलाकारांनी करुन मैफलीचा आनंद द्विगुणित केला. दिनेश गोविल यांनी निवेदनाद्वारे बॉलिवूडच्या सांगीतिक इतिहासाला उजाळा दिला. पवन वंजारी यांनी उत्तम ध्वनीसंयोजन केले. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून कलाकारांना प्रोत्साहन दिले.

### अयोध्येतील पाठशाळेतील समर्थचा सन्मान

अयोध्येतील राममंदिराचे कोषाध्यक्ष गुरु गोविंदगिरी यांच्या पाठशाळेत वेदाध्यायन करणाऱ्या समर्थ देशपांडे याचा सरगम म्युझिक ॲकॅडमीतर्फे मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तो द्वितीय वर्षात व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला असून शैक्षणिक अभ्यासक्रम शिकतांना त्याबरोबरच वेद, उपनिषदे यांची संहिता संथा घेत आहे.



# चंद्रावरच्या पाण्याचे उलगडले कोडे

चंद्रावर पाणी कसे असू शकते, याबद्दल अनेक दशकांपासून शास्त्रज्ञ गोंधळून गेले आहेत. चंद्रावरील हवामान कोरडे आहे. तेथे वारा नाही. वातावरणाचा अभाव आहे. यामुळेच चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाचे गूढच राहिले आहे. गेल्या अनेक वर्षांत यावर बरेच संशोधन झाले आहे. काही संशोधनात यामागे सूक्ष्म उल्का हे कारण असल्याचे सांगण्यात आले. त्याचवेळी आणखी एका संशोधनाने येथील पुरातन खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्याच्या साठ्याकडे लक्ष वेधले.

अमेरिकन स्पेस एजन्सी 'नासा'ने नुकत्याच केलेल्या संशोधनात या प्रश्नाचे उत्तर दिले असून पूर्वीची उत्तरे पूर्णपणे नाकारली आहेत. सौर वारे थेट चंद्राच्या मातीत पाणी तयार करू शकतात, असे 'नासा'च्या संशोधनात म्हटले आहे. 'नासा'च्या गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटरमधील संशोधन शास्त्रज्ञ ली सिया येओ आणि त्यांच्या टीमने हे संशोधन केले आहे. चंद्रावर असणाऱ्या पाणीविषयक प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी शास्त्रज्ञांनी एक वास्तववादी सिम्युलेशन तयार केले आणि सौर वाऱ्याचा चंद्रावर कसा परिणाम होतो हे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

'नासा'चे संशोधक जेसन मॅक्लेन म्हणाले की, संशोधनासाठी चंद्राचे डुप्लिकेट वातावरण तयार करण्यात आले होते. तेथे वारा नव्हता. यासाठी एक अनोखे चेंबर वापरले गेले आणि त्यातून सौर बीम पार केला गेला. अशाप्रकारे व्हॅक्यूम परिस्थिती तयार केली गेली आणि एक रेणू शोधक वापरला गेला. मॅक्लीन म्हणतात की, या संशोधनासाठी ऑपरेटर्स डिझाइन करण्यासाठी बराच वेळ लागला पण त्याचा फायदा झाला. यानंतर याचा सौर वाऱ्याशी विशेष संबंध असल्याचे आढळून आले. या प्रयोगादरम्यान, १९७२ मध्ये 'नासा'च्या अपोलो मिशन १७ दरम्यान चंद्रावरून आणलेल्या मातीचा नमुना वापरण्यात आला.

चंद्रावर पाणी कसे आले?

सूर्यामुळे चंद्रापर्यंत पाणी कसे पोहोचले याविषयी शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की सूर्याची किरणे चंद्रावर पाण्याच्या अस्तित्वाशी जोडलेली आहेत. सौर वारे वाहतात आणि सौर वाऱ्याचे प्रोटॉन चंद्राच्या पृष्ठभागावर आदळतात तेव्हा त्यांना कोणत्याही प्रतिकाराचा सामना करावा लागत नाही. पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र आणि वातावरण या कणांपासून संरक्षण करतात; परंतु चंद्रावर या दोन्ही गोष्टींचा अभाव आहे. त्यामुळे त्याचा परिणाम तिथे दिसून येतो. हे प्रोटॉन चंद्राच्या इलेक्ट्रॉनशी टक्कर देतात. त्यामुळे ते हायड्रोजन अणू तयार करतात. हे हायड्रोजन अणू नंतर सिलिकासारख्या खनिजामध्ये ऑक्सिजनसह एकत्रित होऊन हायड्रॉक्सिल आणि पाणी बनतात. संशोधक येओ म्हणतात, आश्चर्याची गोष्ट म्हणजे चंद्राच्या मातीत असणारे घटक सूर्यापासून आले आहेत. नेहमी हायड्रोजन उत्सर्जित करणाऱ्या सूर्याकडून येणारी चंद्राची माती आणि मूलभूत घटक यातूनच पाणी तयार होण्याची शक्यता असते.

शोध कसा लागला?

संशोधनादरम्यान संशोधकांनी स्पेक्ट्रोमीटरचा वापर केला. त्याच्या मदतीने चंद्राच्या मातीतील रसायनांचे निरीक्षण केले असता त्यात ठराविक काळानंतर बदल होत असल्याचे आढळून आले. त्यांनी सुमारे तीन मायक्रॉन इन्फ्रारेड शोषणात घट पाहिली, जे पाण्याच्या उपस्थितीचे चिन्ह आहे. मात्र किती शुद्ध पाण्याची निर्मिती झाली हे स्पष्टपणे सांगता आलेले नाही. त्यात हायड्रॉक्सिल आणि पाण्याचे दोन्ही रेणू तयार झाल्याचे डेटावरून स्पष्ट झाले आहे.

# कॅलिडोस्कोप

## आयर्लंडमध्ये साप का नाहीत?

ब्राझीलमध्ये भरपूर साप आढळतात. जगातल्या विविध देशांमध्येही साप पहायला मिळतात. मात्र एका देशात साप अस्तित्वातच नाहीत. कोणत्या देशात साप नसावेत, असा प्रश्न



तुम्हाला पडला असेल. आयर्लंड या देशात साप नाहीत. यामागे बरीच कारणं आहेत. काही पौराणिक कथाही आहेत. त्यानुसार सेंट पॅट्रिक नावाच्या एक संताने ख्रिस्ती धर्माच्या सुरक्षेसाठी इथल्या सर्व सापांना गोळा केलं आणि समुद्रात फेकून दिलं. यासाठी त्यांना ४० दिवस उपाशी रहावं लागलं. ही झाली आख्यायिका. पण काही शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार आयर्लंडमध्ये कधीही साप नव्हते. या भागात एकेकाळी साप असले तरी प्रचंड थंडीमुळे ते नष्ट झाले, असं काही शास्त्रज्ञांचं मत आहे. प्रचंड थंडीमुळे इथले साप नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हेच कारण ग्राह्य धरलं जातं.

## पक्ष्यांची वसाहत

सर्वसाधारणपणे माणसांसाठी वसाहती तयार केल्या जातात. पण गाझियाबादमध्ये पक्ष्यांसाठी वसाहत तयार करण्यात आली आहे. गाझियाबाद विकास महामंडळाच्या संचालकांच्या घराच्या गच्चीवर पक्ष्यांसाठी पाच मजली इमारत उभारण्यात आली आहे. हा पक्ष्यांसाठीचा गृहप्रकल्प आहे. या गृहप्रकल्पासाठी दोन लाख रुपये खर्च करण्यात आले. या प्रकल्पात ६० घरटी आहेत. म्हणजे प्रत्येक मजल्यावर १२ पक्षी राहू शकतात. ऊन आणि पावसापासून बचावासाठी या इमारतीवर छत्री लावण्यात आली आहे. चिमणी, बुलबुल, पोपट असे पक्षी इथे राहू शकतात. पक्ष्यांची घरटी लाकडापासून तयार करण्यात आली आहेत. पक्ष्यांचं हे अनोखं अपार्टमेंटच आहे. हा प्रकल्प प्राथमिक स्तरावर सुरू करण्यात आला आहे. इथे पक्षी राहू लागले तर शहरातल्या इतर इमारतींवरही अशाप्रकारे पक्ष्यांसाठी गृहप्रकल्प उभारण्यात येईल. याला 'बर्ड टॉवर' असं नाव देण्यात आलं असून सात फुटांचा हा मनोरा गाझियाबादमध्ये आकर्षणाचं केंद्र ठरला आहे. पक्ष्यांची संख्या वाढवणं आणि त्यांना अधिवास उपलब्ध करून देणं हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.






## जुन्या पासबुकने बदलले नशीब!

कधी कधी अचानक आयुष्याला कलाटणी मिळते. एखादा जुना कागद नशीब बदलून टाकतो. सध्या असाच एक किस्सा चिलीतून समोर आला आहे. वडिलांच्या पासबुकने त्या व्यक्तीला करोडोपती बनवले. याची त्याने कधी कल्पनाही केली नव्हती.

हिनोजोसा नावाच्या माणसाला रद्दीत हा खजिना सापडला आणि काही काळातच तो करोडपती बनला. हा किस्सा लोकांना समजला तेव्हा सर्वजण म्हणू लागले की, नशीब असावे, तर असे. हा माणूस वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या वस्तूंची वर्गवारी करत असताना खूप जुने, धुळीने माखलेले पासबुक सापडले. सुरुवातीला कचरा समजून त्याने दुर्लक्ष केले. मात्र मनात कुतूहल निर्माण झाले आणि त्याने पुन्हा एकदा पासबुक काळजीपूर्वक पाहिले. यावेळी त्याला रहस्य कळले ज्याचा त्याने स्वप्नातही विचार केला नव्हता. आता तो लवकरच करोडपती होणार आहे.

पैसे कसे मिळाले?

१९६०-७० च्या दरम्यान हिनोजोसाच्या वडिलांनी घर घेण्यासाठी १.४ लाख रुपये वाचवले होते. परंतु काही वर्षांपूर्वी ती बँक बंद पडली होती. त्यामुळे कुटुंबीयांना याबाबत काहीच माहिती नव्हती. मात्र पासबुकवर स्टेट गॅरंटी लिहिली होती. म्हणजे बँक बंद झाली तरी जमा केलेली रक्कम परत करण्याची जबाबदारी सरकारची असेल, असे त्यात नमूद करण्यात आले होते. याच्या आधारे त्या व्यक्तीने शासनाकडे मागणी केली असता सरकारने ती फेटाळून लावली.

न्यायालयाचा दणका

हार न मानता हिनोजोसाने पैसे मिळवण्यासाठी सरकारला न्यायालयात खेचले. अखेर प्रदीर्घ कायदेशीर लढाईनंतर न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला आणि सरकारला ६२ वर्षांच्या व्याजासह मूळ रक्कम परत करण्याचे आदेश दिले. न्यायाधीशांच्या आदेशामुळे व्याजासह ही रक्कम सुमारे १० कोटी रुपये (१.२ दशलक्ष डॉलर्स) वाढली. ध्यानीमनी नसताना हिनोजोसावर पैशाचा पाऊस पडला.



## शेवटची फ्लाईट...!

एका विमान कंपनीची फ्लाईट अटेंडन्ट नेहमीप्रमाणे नोकरीवर हजर झाली आणि विमानाने टेकऑफ घेताच प्रवाशांची सेवा करू लागली. पण तिच्या नशीबात काही वेगळेच होते. तिने कधी याचा विचारही केलेला नव्हता. आपल्याबाबत असे इतक्या लवकर कसे घडू शकते याचा विचारच तिच्या मनात आला नव्हता. त्यामुळेच तिने स्वतःला चिमटा काढून पाहिला आणि आपण स्वप्नात तर नाही ना... याची खात्री करून घेतली.

तिची ही अवस्था होण्याचे कारण म्हणजे कॅसिनो गेममध्ये ५०० रुपये लावून तिने तब्बल २१ कोटीची रक्कम जिंकली होती. कॅसिनो डेज प्लॅटफॉर्मवर एक लिमिटेड ऑफर सुरू होती. त्यात एक लाख रुपयांच्या जमा रकमेवर १५० टक्के बोनस मिळत होता. एअर होस्टेस म्हणाली की, हा गेम खेळताना आधी मी एक लाख रुपये लावले. आधी मला दहा कोटी आणि नंतर २० कोटी व शेवटी २१,८३,०२,६७२ कोटी रुपये इतकी रक्कम मिळाली. ती माझ्या खात्यात जमा झाली. हे कळल्यावर खरेतर स्वतःवरच विश्वासच बसत नव्हता. ही रक्कम जिंकल्यानंतर तिने कॅसिनो डेजच्या सपोर्ट टीमला संपर्क साधला. त्यांनी सांगितले की बातमी खरी आहे. तुम्ही करोडपती झाला आहात. पुढे या महिलेने फ्लाईटचा इंटरकॉम उचलला आणि थेट घोषणाच करून टाकली. 'लेडीज एण्ड जंटलमन, मी तुमची एअर होस्टेस बोलत आहे आणि माझी ही शेवटची फ्लाईट आहे...' हे वाक्य ऐकून प्रवासी घाबरले. परंतु एअर होस्टेसने खरी बाब सांगितली. त्यानंतर प्रवाशांनी तिला शुभेच्छा देण्यास रांग लावली आणि केबिनमध्ये उपस्थित लोक चियर्स करू लागले.

## उत्तर कोरियात सॅनिटरी पॅडवर बंदी



उत्तर कोरियात किम जोंग हा हुकूमशहा आहे. तो आणि त्याची बहीण केव्हा काय निर्णय घेतील, हे सांगता येत नाही. या देशात नानातऱ्हेचे अजब-गजब कायदे आहेत. त्यातच आता तेथे महिलांना मासिक पाळीच्या काळात सॅनिटरी पॅड वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.

भारतात सॅनिटरी पॅड मशीन सगळीकडे बसवण्याची मागणी जोर धरत असताना या देशातील हुकूमशहाने हा अजब फतवा काढला आहे. मासिक पाळीविषयी आता समाजात मोकळेपणाने बोलले जाते. ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. पूर्वी शिवाशिव, कावळा शिवला, कावळा बसला असे सांकेतिक भाषेत हे सांगत असे. मात्र आता भारतीय समाजात बरेच बदल दिसत आहेत. मासिक पाळीमध्ये महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रास होतो. या काळात महिलांना बाहेर फिरताना, कार्यालयीन काम करताना अडचणींचा सामना करावा लागतो.

या काळात काळजी घेता यावी म्हणून बाजारात सॅनेटरी पॅड्स, मेंस्ट्रूअल कप्स आणि पीरियड पँटी अशा अनेक गोष्टी उपलब्ध असतात. त्यांचा वापर करून महिला आरामशीरपणे आणि आरोग्य जपत काम करू शकतात. स्वच्छतेची काळजी घेणेही शक्य होते. पण किम जोंगच्या राज्यात सॅनेटरी पॅडसह इतर वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे. आता उत्तर कोरियाच्या बाजारात सॅनेटरी पॅड नाहीत. त्यामुळे या देशातील महिला आणि मुलींना मासिक पाळीच्या काळात कपड्यांचा वापर करावा लागत आहे. एकदा वापरलेले कपडे धुवून त्याचा पुन्हा वापर करण्यात येतो. किम जोग सरकारने सॅनिटरी पॅड्सचे उत्पादन आणि आयातीवर निर्बंध घातले आहेत.

## पॉपकॉर्नविषयी...

चित्रपट बघताना पॉपकॉर्न खाल्ले जातात. या सुट्टीच्या दिवसांमध्ये मुलांची छोटी भूक भागवण्यासाठीही पॉपकॉर्न हा उत्तम पर्याय असतो. एकूणच पॉपकॉर्न हा अनेकांचा आवडता पदार्थ आहे. तेव्हा पॉपकॉर्न खाण्याची सुरूवात नेमकी कधी झाली, याचा इतिहास काय याबद्दल रंजक माहिती जाणून घेऊ.




* प्राचीन काळात अमेरिकेतले मूळ निवासी पॉपकॉर्न खात असत. मग युरोपियन लोकांनीही पॉपकॉर्न खायला सुरूवात केली, असं म्हटलं जातं.

* पॉपकॉर्न तयार करणारं मशीन १३४ वर्षांपूर्वी म्हणजे १८८५ मध्ये तयार करण्यात आलं. अमेरिकेतल्या चार्ल्स क्रेटरने हे मशीन तयार केलं होतं. चार्ल्स शेंगदाणे भाजणारं मशीन बनवण्याच्या प्रयत्नात होता. मात्र नंतर त्याचा वापर पॉपकॉन बनवण्यासाठी होऊ लागला.

* जवळपास चार हजार वर्षांपूर्वी पॉपकॉर्नचा शोध लावण्यात आल्याचं म्हटलं जातं. न्यू मेक्सिकोमध्ये हा शोध लावण्यात आला. त्या काळात पॉपकॉर्नचा वापर सजावटीसाठी केला जात असे. पॉपकॉर्नपासून दागिने बनवले जात असत, असंही म्हटलं जातं.

## वधू-वर हरवले एकमेकांच्या डोळ्यात!

लग्न म्हणजे केवळ दोन माणसांचं मीलन नसून ते दोन हृदयाचंही मीलन असतं आणि ते सुंदर रीतीने सगळ्यांसमोर आलं तर की सगळ्यांनाच आनंद होतो. असाच क्षण एका लग्नसमारंभात पाहायला मिळाला जेव्हा वधू-वर अचानक एकमेकांच्या डोळ्यात हरवून गेले आणि स्टेजवर 'तुमसा कोई प्यारा' गाण्यावर नाचू लागले. हा कोणताही दिखावा नव्हता, नाटक नव्हते तर एकमेकांप्रती असणाऱ्या सर्वांगसुंदर भावनेत साधेपणाने गुंडाळलेले खरे प्रेम होते. त्यांना असे एकमेकांमध्ये हरवलेले बघून संपूर्ण वातावरणच प्रेमाच्या प्रकाशाने भरुन गेले.



लग्न असेल आणि त्यात प्रेमाची झलक नसेल तर उत्सव अपूर्णच वाटतो. पण या लग्नात वधू-वरांनी असे काही केले की सर्वांचे डोळे ओलावले आणि मन हसले. स्टेजवर 'तुमसा कोई प्यारा, कोई मासूम नहीं है...' च्या धूनवर दोघांनी रोमँटिक नृत्य करायला सुरुवात केली तेव्हा संपूर्ण वातावरण स्तब्ध झाल्यासारखे वाटले. हा लग्नसोहळा पारंपारिक पद्धतीने सुरू होता. विधीही याच पद्धतीने केले जात होते. मात्र संगीत सुरू होताच अचानक स्टेजवर उभ्या असणाऱ्या वधू-वरांनी एकमेकांचा हात धरला आणि गाण्यावर नाचायला सुरुवात केली. त्यात कोणत्याही उसने अवसान आणून वा सरावाने केलेल्या हालचाली नव्हत्या. ओव्हरड्रामॅटिक हालचालही नव्हती तर दोघांच्याही डोळ्यांमध्ये एकमेकांबद्दलचे प्रेम तीव्रतेने वाहत होते. वधूचे लाजून हसणे, वराचा साधेपणा आणि त्यांच्या दोघांमधील केमिस्ट्रीने विवाह मंडपाचे प्रेमाच्या मंदिरात रुपांतर झाल्याचेच सगळ्यांना जाणवले.

## असा आहे महागडा तुरुंग

तुरुंग म्हटला की तिथे कैदी असणारच. या कैद्यांवर प्रशासन बराच पैसाही खर्च करतं. त्याच्या रहाण्याची, खाण्याची, आरोग्याची व्यवस्था प्रशासनालाच करावी लागते. जगभरात अनेक तुरुंग आहेत. भारतातलेही बरेच तुरुंग प्रसिद्ध आहेत. मात्र जगातला सर्वात महागडा तुरुंग कोणता हे तुम्हाला माहीत आहे का? हा तुरुंग क्युबामध्ये आहे. इथे एका कैद्यावर कोट्यवधी रुपये खर्च होतात. 'ग्वांतानमो बे' असं या तुरुंगाचं नाव आहे. हा तुरुंग ग्वांतानमो खाडीच्या किनाऱ्यालगत आहे. या तुरुंगात ४० कैदी असून प्रत्येक कैद्यावर वर्षाला ९३ कोटी रुपये खर्च होतात. हा आकडा ऐकून प्रत्येकाचे डोळे विस्फारले असतील. या तुरुंगात १८०० पोलीस आहेत. प्रत्येक कैद्यामागे ४५ पोलीस आहेत. तुरुंगाच्या सुरक्षेसाठीच दरवर्षी ३९०० कोटी रुपये खर्च होतात. या तुरुंगात जागतिक स्तरावरचे अत्यंत धोकादायक कैदी आहेत. या तुरुंग परिसरात तीन इमारती असून दोन इमारतींमध्ये गुप्त मुख्यालयं आहेत. तसंच दोन रुग्णालयंही आहेत. वकिलांसाठीही वेगळी सोय करण्यात आली आहे. इथे वकील कैद्यांशी संवाद साधू शकतात. इथल्या कैद्यांना बऱ्याच सुविधा दिल्या जातात.



# झारखंडमधील ५ कामगारांचे द.आफ्रिकेतील नायजरमध्ये अपहरण

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**

झारखंडमधील पाच कामगारांचं दक्षिण आफ्रिकेतील नायजरमध्ये गुन्हेगारांनी अपहरण केल्याची घटना समोर आली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, बंदुकीचा धाक दाखवून पाच कामगारांचं अपहरण करण्यात आलं आहे. हे सर्वजण १५ महिन्यांपासून एका कंपनीत काम करत होते. मात्र, या पाच जणांचं अपहरण झाल्यापासून त्यांच्या कुटुंबातील सदस्य असह्य झाले असून सरकारकडे मदतीची याचना करत आहेत.

झारखंडच्या गिरिडीह जिल्ह्यातील हे सर्व स्थलांतरित कामगार आहेत. ते एका वीज पारेषण आणि वितरण कंपनीत काम करत होते. दरम्यान, या घटनेबाबत बोलताना ३५ वर्षीय स्थलांतरित कामगार मोजिलाल महतोने सांगितलं की, लोक जेवण संपवून कामावर परतण्याच्या बेतात होते. पण तेव्हाढ्यात गोळीबाराचा आवाज आला. २५ एप्रिल रोजी पश्चिम आफ्रिकेतील नायजर देशातील तिलाबेरी प्रदेशात बंदूकधाऱ्यांनी त्यांचा मेहुणा संजय महतो आणि इतर चार जणांचं अपहरण केलं."

अपहरण केलेल्या कामगारांमध्ये चंद्रिका महतो, संजय महतो, राजू महतो, फलजीत महतो, उत्तम महतो यांचा समावेश आहे. अपहरण झालेल्यांमध्ये नायजरचा देखील एक नागरिक आहे. दरम्यान, "आम्ही कंपनीच्या बसमध्ये आश्रय घेतला आणि पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण ती गाडी वाळूमध्ये अडकली. सुमारे ७०-८० मोटारसायकली आमच्या मागे येत होत्या. त्या सर्व बंदुका घेऊन होत्या", असं मोजिलाल महतोने सांगितलं. या संदर्भातील वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

मोजिलालने पुढे सांगितलं की, "तब्बल दीड तास गोळीबार सुरू होता. आम्ही एका सांडपाण्याच्या पाईपमध्ये घुसून पळून जाण्यात यशस्वी झालो. पण संजय, राजू, फलजीत, चंद्रिका, उत्तम आणि नायजरमधील एका स्थानिकाला अखेर बंदूकधाऱ्यांनी पकडलं. मी शेवटचं पाहिलं तेव्हा फालजीतने हात वर करून आत्मसमर्पण केलं होतं."

दरम्यान, दोंडलो गावातील संजयच्या घरी त्याची पत्नी सोनी देवी हिला तिच्या दोन्ही मुलांना काय बोलावं हे कळत नाही. माझ्या मुलांनी वडिलांबाबत विचारलं तर मी आमच्या मुलांना काय सांगू? हा प्रश्न तिला पडला आहे. ते लवकरच येईतील हे मुलांना सांगण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असंही तिने म्हटलं आहे. तसेच याच गावात राहणाऱ्या राजूच्या कुटुंबालाही पुन्हा त्याच्याशी कधी बोलायला मिळेल का? हा प्रश्न पडला आहे.

"संबंधित कंपनी आणि सरकार या प्रकरणाबाबत शोध मोहीम राबवत असल्याचं आम्हाला कळवण्यात आलं आहे", असं राजूच्या २२ वर्षीय भावाने सांगितलं आहे. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंत्रालयाला या प्रकरणाबाबत माहिती असून सरकार त्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न करत असल्याचं वृत्तात म्हटलं आहे.

# शिवसेना-राष्ट्रवादीच्या पक्ष, चिन्हावर उद्या दीड वर्षानंतर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील राजकारणात तीन वर्षांपूर्वी मोठ्या घडामोडी घडल्या होत्या. शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये बंडखोरी केली होती. त्यांनी स्वतंत्र गट तयार करत आपली शिवसेना खरी शिवसेना असल्याचा दावा केला होता. त्यानंतर वर्षभरात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी झाली. अजित पवार यांनी शरद पवार यांच्याविरोधात बंड पुकारत राष्ट्रवादी पक्षावर दावा केला होता. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या बाजूने पक्ष आणि चिन्हाबाबत निकाल दिला. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांच्या नेत्यांनी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले. आता दीड वर्षांनी शिवसेना आणि राष्ट्रवादीमधील पक्ष-चिन्हाबाबत सुनावणी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयात दीड वर्षानंतर शिवसेना पक्षाचे चिन्ह आणि नाव या याचिकेवर सुनावणी होणार आहे. सप्टेंबर २०२३ नंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पहिल्यांदा यादीवर आले आहे. त्यामुळे या प्रकरणावर आता 7 मे रोजी सुनावणी होणार आहे. तसेच



राष्ट्रवादी पक्षाच्या पक्ष आणि चिन्हावर 14 मे रोजी सुनावणी होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाविरोधात दाखल याचिकांवर ही सुनावणी होणार आहे.

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह प्रकरणात निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या बाजूने निकाल दिला होता. त्याविरोधात उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. उद्धव ठाकरे यांनी फेब्रुवारी 2023 मध्ये ही याचिका सुप्रीम कोर्टात दाखल केली होती. पण या प्रकरणी सप्टेंबर 2023 पासून सुनावणी झालेली नाही. दीड वर्षानंतर पहिल्यांदा हे प्रकरण सुनावणीसाठी 7 मे रोजी कोर्टासमोर लागलेले आहे. त्यामुळे आता 7 मे रोजी तरी हे प्रकरण सुनावणीसाठी येते का? हे पाहणे महत्वाचे आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती कोटेश्वर सिंह यांच्या पुढे ही सुनावणी आहे.

राष्ट्रवादीच्या पक्ष आणि चिन्हावरसुद्धा निवडणूक आयोगाने अजित पवार गटाच्या बाजूने निकाल दिला होता. त्यामुळे शरद पवार गटाकडून आयोगाच्या निर्णयास आव्हान देण्यात आले होते. शरद पवार गटाच्या याचिकेवर अनेक दिवसांपासून सुनावणी नव्हती. आता राष्ट्रवादी पक्षाच्या पक्ष आणि चिन्हावर 14 मे रोजी सुनावणी होण्याची शक्यता आहे. या तारखेला हे प्रकरण कोर्टासमोर लागले आहे.

# मंदिर खोदले तर मशीद मिळेल, कुठपर्यंत खोदणार?

## प्रकाश राज यांनी मोदी सरकारला घेरले

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते प्रकाश राज यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत केंद्र सरकारला प्रश्न विचारण्याबद्दल आणि सामाजिक मुद्द्यांवर आपलं बेधडक मत व्यक्त केलं. प्रकाश राज हे त्यांच्या रोखठोक स्वभावासाठी ओळखले जातात. अनेकदा त्यांनी मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. या मुलाखतीत त्यांनी म्हटलंय की सरकारच्या धोरणांवर आणि निर्णयांवर प्रश्न विचारणं हा त्यांचा अधिकार आहे. कारण लोकशाहीमध्ये नागरिकांना सरकारकडून उत्तरं मागण्याचा अधिकार आहे. "माझी टीका कोणत्याही विशिष्ट व्यक्तीविरोधात नाही, तर समाजातील वाढती असमानता आणि धार्मिक कट्टरतेविरोधात आहे", असंही त्यांनी स्पष्ट केलं.



प्रकाश राज यांनी मंदिर-मस्जिदसारख्या वादग्रस्त मुद्द्यांवर टिप्पणी करताना म्हटलं की, जर यात खोलवर गेलो तर तिथे बुद्धांची शिकवण मिळेल, जे शांती आणि करुणेविषयी सांगतं. 'लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत प्रकाश राज म्हणाले, "लोक नेहरुंबद्दल विचारतात, जेव्हा त्यांचं निधन झालं होतं तेव्हा मी जन्मालाही आलो नव्हतो. मी काय करू? मी तिथे जाऊ का आणि मी कुठपर्यंत खोदून जाईन? औरंगजेब.. जाणार का? आज तुम्ही मशीद खोदली की तुम्हाला मंदिर दिसेल. जर तुम्ही मंदिर खोदलं तर तुम्हाला बुद्ध सापडतील. भाऊ, तू कुठपर्यंत खोदत जाणार? टिपू सुलतानशी माझा काय संबंध, औरंगजेबाशी माझा काय संबंध? हा कदाचित मी झोपलो आणि उशिरा उठलो ही समस्या असेल का? माझ्या प्रश्नावरून समस्या अशी आहे की मी प्रश्न विचारतोय. हीच तुमची समस्या आहे."

प्रकाश राज यांनी यावेळी मोदी सरकारवर निशाणा साधला आणि धार्मिक स्थळांबाबत सुरू असलेल्या वादांवर प्रश्न उपस्थित केले. "धार्मिक उन्मादात अडकण्याएवजी समाजाने शिक्षण, आरोग्य आणि रोजगार यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत केलं पाहिजे. मंदिर-मशीदसारखे वाद केवळ लोकांमध्ये फूट पाडतात. देशाच्या खऱ्या समस्यांवर एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. मी कोणत्याही सरकारच्या विरोधात नाही. परंतु जर कोणतंही चुकीचं धोरण आखलं गेलं तर त्याचा विरोध करणं हे प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य आहे", असं ते पुढे म्हणाले.

प्रकाश राज यांनी असंही स्पष्ट केलं की, त्यासाठी त्यांना कितीही टीका सहन करावी लागली तरी ते त्यांचे विचार मोकळेपणे व्यक्त करण्यापासून कधीही मागे हटणार नाहीत. "एक कलाकार म्हणून समाजाला आरसा दाखवणं आणि लोकांना विचार करण्यास प्रेरित करणं ही माझी जबाबदारी आहे. प्रश्न विचारणं आणि सत्य बोलणं ही लोकशाहीची खरी ताकद आहे. तरुणांनी कोणत्याही मुद्द्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवू नये, तर वस्तुस्थिती तपासून पहा आणि काय बरोबर आहे, काय चूक आहे ते स्वत: ठरवा", असा सल्ला त्यांनी दिला.

# महामार्गाच्या रखडलेल्या कामाविरोधात उद्या कराडमध्ये 'मनसे'चा रास्ता रोको

**गजानन तुपे**

**कराड, दि. ४**

पुणे- बंगळुरू राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाचे काम संथगतीने सुरू आहे. कराड व मलकापूर शहरातून जाणाऱ्या उड्डाणपुलाचे काम तर, रखडलेलेच आहे. अशा अपुऱ्या कामांमुळे पावसाळ्यात लोकांना प्रचंड त्रास सोसावा लागणार आहे. तरी महामार्गाच्या समस्यांबाबत मंगळवारी सकाळी १० वाजता 'मनसे'तर्फे ढेबेवाडी फाटा-मलकापूर येथे सेवारस्त्यावर आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा 'मनसे'चे तालुकाध्यक्ष दादासो शिंगण यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

शिंगण म्हणाले, महामार्गाचे काम करताना 'काम कमी आणि गोंधळ जास्त' घालणाऱ्या शासकीय यंत्रणेविरोधात हा रस्ता रोको आहे. दोन वर्षांपासून महामार्गाचे काम चालू आहे. तेंव्हापासून आवश्यक त्या नागरी सुविधा दिल्या गेलेल्या नाहीत. दोन वर्षे आपण केलेल्या आंदोलनामुळे मळाईदेवी पतसंस्था (नांदलापूर) ते कोल्हापूर नाक्या दरम्यान, पाच कोटींचे महामार्गाच्या दोन्ही सेवा रस्त्यांवर डांबरीकरणाचे काम झाले. नागरिक, शालेय विद्यार्थी, वाहनधारक, व्यापारी व स्थानिकांना त्रास होवू नयेत, म्हणून सातत्याने आंदोलन



करीत आहे. गेल्या महिनाभरापूर्वीच डी. पी. जैन कंपनीचे अनेक कर्मचारी वेतन आणि निर्वाह भत्ता न मिळाल्यामुळे निम्यातून काम सोडून गेल्यामुळे मोठी दुरावस्था झाली आहे. रस्त्याकडील अनेक ठिकाणी गटारे उघडी असल्याने त्याचा मोठा धोका आहे. नव्याने येणारे अधिकारी, कर्मचारी कंत्राटी पद्धतीने येतात. त्यामुळे ते काम अर्ध्यावर सोडून जात आहेत. महामार्गावर ओढे, नाले बुजवल्याने पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणताही मार्ग नाही. बाजूची गटारे पाच फुटांचीच असल्याने ती तुंबून पावसाळ्यात जिथे- तिथे तलावाची स्थिती होते. जुन्या गटारांवरील मोठी झाकणे अनेक ठिकाणी फुटली आहेत. तसेच त्यातील पाणी खड्ड्यात साचते. ते खड्डे दिसत नसल्याने लोकांच्या जीवालाही मोठा धोका असल्याचे शिंगण यांनी सांगितले.

## प्रथम राष्ट्रीय दांडपट्टा अजिंक्यपद स्पर्धा 2025

# मुंबई उपनगर संघाची 11 सुवर्ण व 9 रौप्य पदकांची लाजवाब कमाई




**नाशिक, दि. ४ वृत्तसंस्था**

नाशिक येथे २९ व ३० एप्रिल २०२५ रोजी आयोजित प्रथम राष्ट्रीय दांडपट्टा अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये मुंबई उपनगर संघाने जबरदस्त कामगिरी करत एकूण ११ सुवर्ण आणि ९ रौप्य पदके पटकावली. या यशस्वी संघात आदित्य पेडणेकर, यश पाठक, पराशिव दुबे, नविशा खंदारे, आद्या दुबे, नव्या पेडमकर, काव्या देवरुखकर, स्वाती शिंदे, प्रियांका चव्हाण, आणि दीपा पेडणेकर या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. संघाचे प्रशिक्षक श्री. समीर पेडणेकर तसेच दांडपट्टा खेळाचे मार्गदर्शक महागुरू सुभाष मोहिते सर यांचे या यशामध्ये मोलाचे योगदान लाभले. या भव्य यशाबद्दल सर्व खेळाडूंना, प्रशिक्षकांना आणि मार्गदर्शकांवर शुभेच्छा व अभिनंदनाचे वर्षाव करण्यात येत आहे.

# नीट परीक्षेत ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्याला जानवे काढण्यास लावले

## परीक्षा केंद्राबाहेर आंदोलन




**कलबुर्गी, दि. ४ वृत्तसंस्था**

कर्नाटकातील कलबुर्गी नीट परीक्षेला बसलेल्या ब्राह्मण विद्यार्थ्यांना त्यांच्या शरीरावरील जानवं काढायला लावल्याने मोठा वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे रविवारी ब्राह्मण समाजाने याविरोधात नीट परीक्षा केंद्राबाहेरच निदर्शने केली.

श्रीपाद पाटील नावाच्या एका विद्यार्थ्याला परीक्षा केंद्र असलेल्या सेंट मेरी स्कूलमध्ये त्याचं जानवं काढायला लावण्यात आलं. त्यानंतरच त्याला परीक्षा हॉलमध्ये प्रवेश दिला गेला, असे वृत्तसंस्था पीटीआयने दिले आहे. हे वृत्त बाहेर पसरताच ब्राह्मण समाजातील एक मोठा गट या नीट परीक्षा केंद्राबाहेर जमा झाला. त्यांनी निदर्शने केली. घोषणाबाजी करून धरणे आंदोलनही केले. अधिकाऱ्यांनी धार्मिक भावनांचा अनादर केल्याचा आरोप आंदोलकांनी केला असून सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. एएनआयने प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओमध्ये आंदोलक त्यांचा पवित्र धागा दाखवत आहेत आणि कार्यक्रमस्थळाबाहेर सुरक्षा अधिकाऱ्यांशी सामना करत आहेत.

या घटनेनंतर, राज्य सरकारने संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अशा घटना रोखण्यासाठी नवीन सूचना जारी केल्या आहेत. पीटीआयच्या म्हणण्यानुसार, १६ एप्रिल रोजी झालेल्या कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (सीईटी) परीक्षेतही असाच प्रकार घडला होता. येथेही ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांचे जानवे काढून टाकण्यास सांगण्यात आले होते.

# युट्यूबचे भारताच्या "क्रिएटर नेशन" ला बळकटी देण्यासाठी 850 कोटी




मुंबईतील पहिल्या जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषदेत [वेव्हज], युट्यूबचे सीईओ नील मोहन यांनी भारताचा "क्रिएटर नेशन" म्हणून उदय झाला हे उघड केले, आणि खुलासा केला की गेल्या वर्षी भारतातील १०० दशलक्षाहून अधिक चॅनेल्सनी कंटेंट अपलोड केला, त्यापैकी १५,००० हून अधिक चॅनेल्सनी दहा लाखांपेक्षा जास्त सबस्क्राइबर्सना पाठवले. त्यांनी युट्यूबच्या महत्त्वपूर्ण आर्थिक परिणामावर भर दिला, असे सांगून की गेल्या तीन वर्षांतच या प्लॅटफॉर्मने भारतीय निर्माते, कलाकार आणि मीडिया कंपन्यांना २१,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे दिले आहेत. युट्यूबने या निर्मात्यांना त्यांच्या आवडी यशस्वी व्यवसायात रूपांतरित करण्यासाठी आणि निष्ठावंत जागतिक चाहते जोपासण्यासाठी कसे सक्षम केले आहे यावर नील यांनी भर दिला. भारताच्या वाढत्या क्रिएटर अर्थव्यवस्थेच्या वाढीला आणखी गती देण्यासाठी पुढील दोन वर्षांत ८५० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याची घोषणा त्यांनी केली. गेल्या वर्षी, भारतात तयार केलेल्या कंटेंटने देशाबाहेरील प्रेक्षकांकडून ४५ अब्ज तासांचा पाहण्याचा वेळ मिळवला.युट्युबचे सीइओ नील मोहन म्हणाले, "युट्युब निर्मात्याला कुठेही आणि कुठेही असलेल्या प्रेक्षकांशी जोडण्याची क्षमता सांस्कृतिक निर्यातीचे एक शक्तिशाली इंजिन बनवते आणि भारताइतके प्रभावीपणे काही राष्ट्रांनी याचा वापर केला आहे. आज, भारत केवळ चित्रपट आणि संगीतासाठी जागतिक नेता नाही - ते वेगाने "निर्माता राष्ट्र" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देशासारखे होत आहे."

## इस्त्रायलच्या विमानतळावर क्षेपणास्त्र हल्ला

# तेल अवीवला जाणारी एअर इंडियाची उड्डाणे दोन दिवसांसाठी स्थगित

**नवी दिल्ली, दि. ४ वृत्तसंस्था**

इस्त्रायलमधील बेन गुरियन आंतरराष्ट्रीय विमानतळावर हुथी बंडखोरांनी रविवारी सकाळी बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला केला. या हल्ल्यामुळे विमानतळावर मोठा गोंधळ उडाला. दरम्यान, बेन गुरियन आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे तेथे तेल अवीवला जाणारे विमाने दुसरीकडे वळवण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे.




दिल्लीवरून तेल अवीवला जाणारे एअर इंडियाचे विमान संयुक्त अरब अमिरातीतील अबू धाबीमध्ये वळवण्यात आलं आहे. एअर इंडियाचं हे विमान आता अबू धाबीमधूनच दिल्लीला परतणार आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर एअर इंडिया ६ मे पर्यंत तेल अवीवला जाणारी उड्डाणे स्थगित केले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

आंतरराष्ट्रीय माध्यमांच्या वृत्तानुसार, येमेनस्थित हुथी बंडखोरांनी इस्त्रायलच्या बेन गुरियन आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात बॅलिस्टिक क्षेपणास्त्र हल्ला केला आहे. त्यामुळे या हल्ल्यात काही लोक जखमी झाले आहेत. या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारताना तेल अवीव विमानतळ प्रवासासाठी सुरक्षित नाही असा इशारा हुथींनी विमान कंपन्यांना दिला आहे. दरम्यान, गाझामधील इस्त्रायलच्या लष्करी हल्ल्यामुळे हुथी इस्त्रायलवर हल्ले करत असल्याचं बोललं जात आहे.

# बॉलीवूड स्टार पंकज त्रिपाठी युरो ॲडहेसिव्ह्जचा ब्रँड अम्बेसेडर




ज्योती रेसिन्स ॲण्ड ॲडहेसिव्ह्ज लिमिटेडची प्रमुख ब्रँड युरो ॲडहेसिव्ह्ज जी भारतातील लाकूड ॲडहेसिव्ह्जच्या श्रेणीत सर्वात वेगाने वाढणाऱ्या ब्रँड्सपैकी एक आहे हिने प्रख्यात अभिनेता पंकज त्रिपाठी यांची पहिल्यांदाच ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. ही रणनीतिक भागीदारी राष्ट्रीय स्तरावर ब्रँडचा विस्तार साधण्याच्या आणि ग्राहक, व्यावसायिक तसेच व्यापारी भागीदारांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्याच्या व्यापक दृष्टीकोनाचा एक भाग आहे. या घोषणेसोबतच युरो ॲडहेसिव्ह्जची नवीन जाहिरात मोहीम #SirfJodo NahinFayedonKeSaathJo do सुरू होत आहे ब्रँडच्या विकसित झालेल्या मूल्य प्रस्तावाचे प्रभावी सादरीकरण. ही मोहीम केवळ मजबूत जोड नव्हे, तर जलद वाळणं, दीमक प्रतिकार, जलरोधकता, हवामान प्रतिकारक्षमतेसारख्या फायद्यांची खात्री देते आणि कमी उत्पादन वापरून अधिक कव्हरेज प्रदान करते. ही 360° जाहिरात मोहीम मे 2025 मध्ये टीव्ही, प्रिंट, डिजिटल व बाह्य माध्यमांवर सुरू होणार आहे.या मोहिमेमध्ये पंकज त्रिपाठी वेगवेगळ्या भूमिकांमध्ये दिसतात एक शेजारचा हार्डवेअर दुकानाचा मालक आणि एक सजग गृहस्वामी जिथे प्रत्येक चित्रफितीत दैनंदिन आयुष्यातील ॲडहेसिव्ह्ज संदर्भातील समस्येचं युरो ॲडहेसिव्ह्जद्वारे समाधान दाखवण्यात आले आहे.

# हारपिकने शाहरुख खानला नियुक्त केले आपला ब्रँड ॲम्बेसेडर




**लोकार्थ**

हारपिकने शाहरुख खानच्या साथीत "हारपिक है ना" ही नवीन मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेमार्फत शौचालय स्वच्छतेच्या प्रत्येक पैलूमध्ये हारपिकची श्रेष्ठता अधोरेखित केली असून, प्रत्येक घरात उच्च दर्जाची स्वच्छता मिळवून देण्याचा विश्वास सुद्धा व्यक्त करण्यात आला आहे.

भारतातील क्रमांक १ शौचालय व बाथरूम क्लिनर आणि १० कोटींपेक्षा अधिक कुटुंबांचा विश्वास संपादन करणाऱ्या गृहस्वच्छतेच्या अग्रगण्य ब्रँड हारपिकने आज आपल्या यशस्वी प्रवासातील एक ऐतिहासिक क्षण जाहीर केला आहे, बॉलीवूडचा बादशहा शाहरुख खान आता हारपिकचा ब्रँड ॲम्बेसेडर असेल. ही विशेष भागीदारी हारपिकनेच्या उत्कृष्ट स्वच्छतेच्या परंपरेला शाहरुख खानच्या लोकप्रियतेशी, मूल्यांशी आणि भारतीय कुटुंबांवरील प्रभावाशी जोडते.शंभर वर्षांहून अधिक काळापासून हारपिकने जागतिक पातळीवर स्वच्छता आणि आरोग्याच्या मानकांना नव्याने परिभाषित करण्याचे नेतृत्व केले आहे. आज हारपिक भारतातील दर तीनपैकी एका कुटुंबापर्यंत पोहोचत असून, शहरी तसेच ग्रामीण भागातील कुटुंबांना सक्षम बनवण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली आहे. हे एक प्रभावी, विश्वासार्ह आणि शक्तिशाली स्वच्छतेचे समाधान प्रदान करते. शाहरुख खान यांच्यासोबतची भागीदारी हा हारपिकच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे, जो प्रत्येक भारतीय घरात स्वच्छता, सन्मान आणि काळजीची प्रेरणा देण्याचे उद्दिष्ट बाळगतो.

# बेलरिस इंडस्ट्रीज कडून एच-वन इंडियाचे धोरणात्मक अधिग्रहण पूर्ण

ऑटोमोटिव्ह-घटक उत्पादक आणि भारतातील एकूण दुचाकी धातू घटक विभागातील आघाडीच्या कंपन्यांपैकी एक बेलरिस कंपनीने जपान-स्थित सार्वजनिकरित्या सूचीबद्ध एच-वन कंपनी लि. ची उपकंपनी एच-वन इंडियाचे संपादन करण्याची घोषणा केली. या संपादनाचा उद्देश बेलरिसच्या डिझाइन आणि उत्पादन क्षमतांचा विस्तार करणे आणि भारतीय ऑटोमोटिव्ह मार्केटमध्ये चेसिस सिस्टम आणि बॉडी-इन-व्हाइट पार्ट्सचा पुरवठादार म्हणून त्याचे स्थान मजबूत करणे आहे.एच-वन इंडिया, एच-वन कंपनीची भारतीय उपकंपनी, चार-चाकी आणि दु-चाकी वाहनांसाठी उच्च-ताण सहन करणाऱ्या स्टील घटकांचे डिझाइन आणि उत्पादन आणि उच्च-ताण सहन करणाऱ्या उपकरण विकासामध्ये गुंतलेली आहे. उच्च ताण सहन करणारे पण हलके वजन असलेले स्टील उत्पादन, वाहनांची सुरक्षितता वाढवण्यासाठी, इंधन कार्यक्षमता आणि एकूण कार्यक्षमतेसाठी उच्च-ताण सहन करणारे स्टीलचे घटक महत्त्वाचे आहेत. हे उच्च -ताण सहन करणाऱ्या सामग्री उच्च शक्ती-ते-वजन गुणोत्तर देतात, ज्यामुळे वाहन निर्मात्यांना कडक सुरक्षा आणि पर्यावरणीय मानकांची पूर्तता करणाऱ्या हलक्या परंतु टिकाऊ आणि मजबूत वाहनांची रचना करता येते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# देशातील पाच मोठ्या बँकांना आरबीआयचा दणका, लाखो रुपयांचा दंड

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

देशातील ५ मोठ्या बँकांवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने कारवाई केली आहे. पाच बँकांना लाखो रुपयांचा दंड ठोठावला आहे. यामध्ये देशातील आघाडीच्या आयसीआयसीआय बँक, ॲक्सिस बँक, आयडीबीआय बँक, बँक ऑफ बडोदा आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचा समावेश आहे. कोणत्या बँकेवर किती दंड आकारण्यात आला याबाबतची सविस्तर माहिती पाहुयात.

देशातील सर्वात मोठ्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या आयसीआयसीआय बँकेला आरबीआयने एकूण ९७.२० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. सायबर सुरक्षा फ्रेमवर्क, केवायसी, क्रेडिट आणि डेबिट कार्डवरील काही सूचनांचे पालन न केल्याबद्दल आयसीआयसीआय बँकेवर हा दंड ठोठावण्यात आला आहे.

देशातील सर्वात मोठ्या खाजगी बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेला आरबीआयने २९.६० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ऑफिस खात्यांच्या अनधिकृत कामकाजाबाबत आरबीआयच्या सूचनांचे पालन न केल्याबद्दल ॲक्सिस बँकेवर हा दंड ठोठावण्यात आला आहे.




आरबीआयने आयडीबीआय बँकेला एकूण ३१.८ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. किसान क्रेडिट कार्डद्वारे शेती आणि संबंधित कामांसाठी दिलेल्या अल्पकालीन कर्जावरील व्याज अनुदानाशी संबंधित सूचनांचे पालन न केल्याबद्दल आयडीबीआय बँकेवर हा दंड ठोठावण्यात आला आहे.

बँक ऑफ बडोदाला आरबीआयने एकूण६१.४० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. बँकेत असलेल्या वित्तीय सेवा आणि ग्राहक सेवा काउंटरवर जारी केलेल्या सूचनांचे पालन न केल्याबद्दल बीओबीवर हा दंड ठोठावण्यात आला आहे.

आरबीआयने बँक ऑफ महाराष्ट्रला एकूण ३१.८० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. केवायसीशी संबंधित सूचनांचे पालन न केल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रवर हा दंड ठोठावण्यात आला आहे.

# रेखा यांनी 'या' अभिनेत्रीच्या लगावली होती कानशिलात

**मुंबई, दि. ४ प्रतिनिधी**

बॉलीवूड अभिनेत्रींमध्ये असलेलं बॉन्डिंग आणि त्यांच्यात असलेली भांडणं ही नेहमीच सोशल मीडियावर चर्चेत असतात. त्यांच्या चाहत्यांना नेहमीच अभिनेत्रींच्या खऱ्या आयुष्यात काय होतंय हे जाणून घेण्याची इच्छा होते. असाच एक किस्सा स्वत: अभिनेत्रीनं सांगितला होता, तेव्हा सगळ्यांना मोठा धक्का बसला होता. हा किस्सा दिग्गज अभिनेत्री रेखा यांच्या संबंधित आहे.

आरती छाबडिया ही लोकप्रिय अभिनेत्री आहे. आरती छाबडियाने १९९९ मध्ये मिस इंडिया वर्ल्डवाइडचा किताबही जिंकला आहे. तिने सुखविंदर सिंग यांच्या 'नशा ही नशा है' या गाण्याने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. यानंतर ती चित्रपटांमध्ये आली. तिने अनेक चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत.



आरती छाबडिया आता सोशल मीडियावर फॅशन इन्फ्लुएन्सर म्हणून लोकप्रिय झाली आहे. आरतीनं 'लज्जा' सिनेमातून बॉलीवूडमध्ये एन्ट्री केली होती. या सिनेमात तिच्यासोबत माधुरी दीक्षित, अजय देवगण, रेखा यांच्यासह अनेक लोकप्रिय कलाकारांच्या भूमिका होत्या. या सिनेमाच्या सेटवरचा एक किस्सा सध्या चर्चेत आला आहे.

एका सीनमध्ये आरतीला रेखा कानशिलात लगावणार होत्या, पण या गोष्टीची आरतीला कल्पना नव्हती. जेव्हा रेखा यांनी तिच्या कानाखाली मारली तेव्हा आरती ढसाढसा रडू लागली. या गोष्टीचा खुलासा स्वत: आरतीने एका मुलाखतीदरम्यान केला होता. तिने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, 'लज्जा' चित्रपटाच्या सेटवर रेखा यांनी तिला कानाखाली मारली होती. रेखा यांनी शूटिंगदरम्यान तिला मारल्यानंतर ती ढसाढसा रडू लागली होती." आरतीची परिस्थिती पाहून सिनेमाचे दिग्दर्शक आणि रेखा यांनी तिला समजावलं होतं.

महासागर NASHIK

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at S. R. publication, Mohan - Arjun Compund, Godown No. 8, 9 & 10, Near Ghartan Pada, Vaishali Nagar Last Bus Stop, Dahisar (E),Mumbai - 400068 and Published From 'ANANDI', KOTWAL PARK, TILAKWADI, APP. VED MANDEER, DHAMANKAR CORNER, NASHIK 422002 , Editor - SHRIKRISHNA TANSUKHDAS CHANDAK Executive Editor- Sanju Pawar, Resident Editor- Jayant Mahajan.

महासागर नाशिक

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी एस. आर. प्रिंटर्स, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडावून नं. ८,९,१०, घरटन पाडा, वैशाली नगर, दहिसर ईस्ट, मुंबई येथे मुद्रीत करून 'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२ . येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - संजू पवार (मो. नं. ९८९०१०९९७८) निवासी संपादक - जयंत महाजन (९४२०६९१४२०) Email : mumbaimahasagar@gmail.com